म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
क्र. नं. ५१८

ठाणे

# संगम

लघु निबंध संग्रह

द. दा. पेंडसे
द. पा. पेंडसे

REFBK-0005251

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्र.
दि.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं.

# संगम

लघुनिबंध संग्रह

भाग १ ला.

लेखक—श्री. दत्तात्रय दामोदर पेंडसे.

REFBK-0005251

भाग २ रा.

लेखक—श्री. दत्तात्रय पांडुरंग पेंडसे.

प्रथमावृत्ति] किंमत ८ आणे. [सन १९३५

मराठी ग्रंथ संग्रहालय ... ग्रा. क्र. ५२५१

प्रकाशक—
दामोदर सांवळाराम आणि मंडळी
१८०, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकांनीं स्वाधीन ठेविले आहेत.

मुद्रक—
नरहरि माधवराव यंदे,
इंदुप्रकाश प्रेस, ठाकुरद्वार, मुंबई नं. २.

# घाटावरून—

श्री. दत्तात्रय दामोदर पेंडसे व श्री. दत्तात्रय पांडुरंग पेंडसे या दोन पेंडसे कुलोत्पन्न तरूण लेखकांनीं लिहिलेल्या लघुनिबंधांचा हा चिमुकला 'संगम' आज वाचकांच्या हवालीं करण्याचें काम मजकडे आलें आहे. या दोन तरुण लेखक-मित्रांमध्यें उपनांवाप्रमाणें एकाच लेखनप्रकाराची आवड हेंहि एक महत्वाचें साधर्म्य आहे. त्यामुळें दोघांच्या लेखसंग्रहाचा हा 'संगम' 'गंगाजमनी' न वाटतां, एकाच सरितेच्या दोन प्रवाहांच्या मीलनाप्रमाणें नैसर्गिक वाटतो व 'सुरेख संगम किती!' असे उद्गार सहजच मुखावाटे निघतात.

आधुनिक मराठी वाङ्मयांत 'लघुनिबंध' या लेखन प्रकाराकडे आतां पुष्कळ लेखकांचें लक्ष वळूं लागलें आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. विशिष्ट विषयावर प्रदीर्घ निबंध लिहिण्याची प्रथा कै. लोकहितवादी व कै. विष्णुशास्त्री चिपळूकर यांनीं मराठी साहित्यांत प्रथम सुरू केली. त्यांचें अनुकरण अनेक नामवंत लेखकांनीं आजपर्यंत केलेलें आहे. निबंध या वाङ्मयप्रकाराची रुपरेषा आतां इतकीं ठरून गेलेली आहे कीं, तो शब्द उच्चारतांच अत्यंत गंभीर व बहुधा रुक्ष विषय, मंद व गजगामिनी लेखन-पद्धति, उगाच उकरून काढलेल्या क्लिष्ट मुद्यांची साधकबाधक चर्चा व कोणालाही जगांत उपयोगी न पडणारे निष्कर्ष, इत्यादि नैबंधिक प्रकार आपल्या डोळ्यांसमोर आपोआप उभे रहातात. निबंधाला Essay असा इंग्रजी पर्याय आहे तो एका अर्थी बरोबरच आहे. कारण Essay शद्बाचा धात्वर्थ शक्ति एकवटून प्रयत्न करणें असा आहे. निबंधाचें रुक्ष स्वरूप पाहिलें म्हणजे तो निर्माण करतांना लेखकाला पुष्कळच वळ—आणि त्यांतले बरेंचसें 'ओढून ताणून'—एकवटावें लागत असावें. जुन्या

नाटकाची सुरवात जशी नांदीपासून तशी निबंधाची सुरुवात हमखास व्याख्येपासून किंवा विषयवाचक शब्दाच्या विग्रहापासून झालेली असावयाची 'इति+इ+आस' हें उदाहरण नामांकित आहे. "या अवनीतलावर अवतीर्ण झालेल्या मनुष्यमात्राच्या चलनवलनादि व्यापाराचा साकल्येंकरून विचार केल्यास" अशा धर्तीच्या वाक्यानें निबंधाचें बहुधा उद्घाटन होत असें. यामुळें तरुण मंडळी सहसा निबंधाच्या वाटेला जात नसत. तरुणांनीं प्रेमकाव्यें व गोष्टी वाचावयाच्या व वृद्धांनीं पोथ्या व निबंध यांचीं पारायणें करावयाचीं ही वांटणी जवळ जवळ ठरूनच गेलेली होती. किंबहुना, निबंधवाचन म्हणजे एक प्रकारची शिक्षाच होती. गडकऱ्यांनीं 'ठकीच्या लग्नांत' प्लेटो व फिडो या निबंधाचें वाचन शिक्षेदाखल योजिलेलें वाचकांना माहीत असलेंच. चिपळूणकर, आगरकर, परांजपे व केळकर यांचे अपवादात्मक उज्ज्वल निबंध वजा केले तर बाकीच्या सर्व निबंधांची तऱ्हा वर सांगितल्याप्रमाणेंच होती.

जुन्या व नव्या वाङ्मयांत एक महत्वाचा व तात्विक फरक असा आहे कीं, जुन्या वाङ्मयांत लेखकाची दृष्टी विषयप्रतिपादनापुरतीच गुंतलेली नसून स्वतःला व इतरांना त्यापासून बोधप्रद निष्कर्ष काय निघेल तो शोधून काढण्याकडेच असे. नीति सुधारण्याचा हा नाद समाजाला फार प्राचीन काळापासून लागलेला आहे. म्हणून सदुपदेशप्रचाराची जी सनातन मोहीम समाजानें काढलेली आहे. तिच्यांत प्रत्येक सामाजिकाचें आपल्याला सहाय्य मिळावें अशी समाजाची सहाजिकच अपेक्षा असते. मतप्रचारासाठीं कलेला वेठीला धरण्याची विद्या आधुनिकांतले आधुनिक म्हणून समजल्या जाणाऱ्या आजच्या रशियांतील समाजसत्तावाद्यांनींही अविलंबिलेली आहे. यावरून नीतिवादी लेखनपद्धतीचा पगडा एकंदर लोकांच्या मनावर किती बसलेला आहे हें सहज कळून येण्यासारखें आहे. इतर वाङ्मयप्रकारापेक्षां नीतिप्रचाराची

जबाबदारी निबंधावरच पहिल्यापासून पडत आलेली आहे. त्यामुळें निबंधाला सामान्यतः पुराणिकाच्या प्रवचानाचें स्वरूप आलेलें आहे.

कोणताही मानवी–व्यापार हा सहेतुकच असतो. त्यापासून त्याला स्वतःला कांहींतरी साध्य करून घ्यावयाचें असतें. लोणी निष्पन्न होणार नसलें तर ताकाचें पाणी कोण घुसळीत बसेल ? कांहीं लभ्यांश मिळणार नसेल तर नुसत्या कलेच्या कसरती करणार तरी कोण ? आणि त्या पहाणार तरी कोण ? ही गोष्ट जरी निर्विवाद असली, तरी कलेपासून प्राप्त करून काय घ्यावयाचें यासंबंधीं मात्र मोठा मतभेद आहे. सगळें भांडणाचें मूळ इथें आहे. कलावादी ताक घुसळतो तें रूचकर लोण्याचा गोळा खावयाला मिळावा म्हणून; पण ताक घुसळतांना दंडाच्या स्नायूला व्यायाम मिळतो व प्रकृति सुधारते, ही नीतिवाद्याची दृष्टी असते. पंचपक्वान्नांच्या मेजवानीवर ताव मारतांना षड्रसांच्या सेवनानें होणाऱ्या समाधानापेक्षां त्यामुळें आपल्या शरिराचें वजन अमुक रत्तलांनीं वाढणार आहे, इकडे नीतिवाद्याचें लक्ष असतें.

कलेपासून निष्पन्न होणारा नैसर्गिक परिणाम हेंच कलेचें साध्य आहे. या व्यातिरिक्त दुसरा हेतू कलेच्या माथीं मारण्यांत कलेची हानी होते. डोंगऱ्यांच्या बालामृताच्या जाहिरातींत काढलेले बालकाचें चित्र कितीही सुंदर असलें किंवा कामिनीया तेलाची कामगिरी पटविण्यासाठीं काढलेल्या चित्रांतील कामिनीचा केशकलाप कितीहि लाबलचक व सुंदर दाखविला, तरी त्या योगानें रसिकांच्या मनाला शुद्ध आनंद मिळूं शकत नाहीं. रस्त्यावरील भिकारणीचें गाणें तिनें दिडकीसाठीं हात पुढें करीपर्यंतच मधुर वाटतें. फॅन्सी फेअर मधील मालाची विक्री करण्यासाठीं योजिलेल्या मोहक तरुणी माल विकत घेण्याची गळ घालीपर्यंतच गिऱ्हाईकांना आकर्षक वाटतात. तशीच कलेची स्थिति

आहे. हातांतला दिलरुबा टाकून फंडाची पेटी खुळखुळवीत कलासुंदरी पुढें आली म्हणजे दुसरीकडे बघण्याचें सोंग करावेसें वाटतें. रावणाच्या घरीं बंदींत असलेल्या देवादिकांना कांहीं काळ मजुराप्रमाणें राबावें लागलें, त्याप्रमाणें कलेलाही आजच्या युगांत कांहीं मदोन्मत्त समाजसत्तावाद्यांच्या राजवटींत मोलकरणीची कामें करावीं लागलीं तरी तिचें खरें स्वरूप व कार्य याविषयीं रसिकांची आतां दिशाभूल होणें शक्य नाहीं.

मात्र कलेला प्रतिष्ठा प्राप्त झाली म्हणजे सद्वर्तनाला पोबारा करावा लागेल असें पुष्कळांना जें भय वाटतें तें निरर्थक होय. नाचणें ही कला असली, तरी 'नागवें नाचणें' ही कांहीं कला नाहीं. डोक्याला रूमाल चांगला बांधण्यांत कौशल्य असलें, तरी कमरेचें सोडून डोक्याला गुंडाळण्यांत कांहीं फारशी कुशलता लागत नाहीं. कलेमुळें निव्वळ आनंदच प्राप्त होतो ही कल्पना कित्येकांना गौण वाटते. जणुं काय, आनंदाची भावना जीवनाला उपकारक नाहींच. कलाकृति पाहून रसिकांना हर्ष व आनंद तर प्राप्त होतोच; पण त्याशिवाय ती कलाकृति घडवितांना कलावंत आपली जी विशिष्ट दृष्टी व्यक्त करतो, तिजमुळें रसिकाच्या दृष्टीकोनांतही बदल होत जातो. हा फायदा कांहीं सामान्य नाहीं. उच्च कलाकृतीमुळें जीवनाचा विकास होणें ही गोष्ट अगदीं अपरिहार्य आहे.

निबंध लेखन हा केवळ शालेय व्यवसाय नसून ती एक वाङ्मयात्मक कला आहे, हें प्रतिपादन केलें असतां निबंधाच्या जुन्या उपासकांना धक्का बसेल म्हणून येथवर हें थोड्याशा विस्तारानें विवेचन करावें लागलें. आतां 'लघुनिबंध' हा प्रकार पूर्वीच्या प्रदीर्घ स्वरूपीं निबंधाचा आधुनिक अवतार आहे असें म्हणून, त्यासंबंधी नीट कल्पना यावयाची नाहीं. पूर्वीच्या लोकांच्या वागणुकींत व वाङ्मयांत फापट-पसारा, ऐसपैसपणा व विस्तार फार असे. डोक्यावर सवा हात शेंडी, त्यावर

रथचक्राकार पागोट्याचें ओझें, घोळदार चुण्यांचा अंगरखा व बोंगेबाज धोतर, असली वेशभूषा करणाऱ्या लोकांना लांबलचक कंटाळवाण्या प्रकरणात्मक कादंबऱ्या, ( म्हणजे ज्यामध्यें, 'वाचकहो ' मागें ४२ व्या प्रकरणांत काय झालें तिकडे आतां वळूं या ' अशी वाचकांना लेखक मधून मधून आठवण करून देत असे. ) सात सात अंकीं नाटकें, पानेंच्या पानें भरून वहाणारे निबंध या गोष्टी साजून दिसत असत सुटसुटीतपणा व आटोपशीरपणा हा हल्लींच्या युगाचें वैशिष्ट्य आहे. दीर्घ निबंधापेक्षां लघुनिबंध हा विस्तारानें लहान असतो किंवा असावा, हें तर उघडच आहे. तथापि, दोहोंतील फरक हा निव्वळ लांबीरुंदीपुरताच नाहीं. ' ' शिशु ' हा ज्याप्रमाणें ' चिमुकला वृद्ध ' नव्हे, त्याप्रमाणें ' लघुनिबंध हा ' छोटा निबंध ' असें म्हणतां येणार नाहीं. म्हणून ' लघुनिबंध ' हें नांवही एका अर्थी बरोबर नाहीं. तथापि, तो शब्द आतां पुष्कळच प्रचारांत आला असल्याकारणानें व या पुस्तकाच्या कर्त्यानींही तो हेतुपूर्वक वापरला असल्यामुळें त्यावर आता टीका करण्यांत हांशील नाहीं. तैलचित्र व रेखाचित्र यामध्यें जितकें अंतर आहे, तितकेंच ' निबंध ' व ' लघुनिबंध यांत तत्वतः अंतर आहे. लघुनिबंधाचे विषय, लेखन पद्धति हीं निबंधापेक्षां भिन्न आहेत. ' सुपारी, ' ' चुंबन, ' ' स्त्रियांचे गाल ' ' कवींची बायको ' ' न्हावी ' ह्या विषयांवर निबंध लिहिणाऱ्याला येरवड्याच्या बाजूकडे रहावयाला जाण्याचा सल्ला मिळाल्याखेरीज रहाणार नाहीं. तथापि, या विषयांवर ' लघुनिबंध ' लिहिणें शक्य आहे व तसे या पुस्तकांत लिहिलेही पण आहेत. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं, ज्या विषयावर कोणीही ' निबंध ' लिहिणें शक्य नाहीं. तेच विषय ' लघुनिबंधासाठीं ' योग्य असतात. दररोज डोळ्यापुढें दिसणाऱ्या सामान्य गोष्टी, प्रत्येकाला पदोपदीं येणारे बारीक सारीक अनुभव किंवा सहज कुठेंही घडतील असे प्रसंग निवडून त्यांची

# निमज्जनापूर्वी–

रसिक वाचक,

'घाटावरून' पुढें येऊन आतां 'संगमांत आपण अवगाहन करणार आहांत. 'संगमाचा' पहिला भाग रा. दत्तात्रय दामोदर पेंडसे व दुसरा रा. दत्तात्रय पांडुरंग पेंडसे यांनीं लिहिला आहे. यांतील कांहीं लेख 'सह्याद्रि', 'प्रतिभा' व 'वैश्ययुवकांतून' प्रसिद्ध झाले आहेत. गंगायमुनांच्या संगमाप्रमाणें हा 'संगम' वैभवशाली व अफाट नसला, तरी कोंकणी ओढ्यांचा हा 'संगम' वाचकांस आल्हाद देईल, अशी आम्हांस आशा आहे.

विडंबनाचार्य, विनोदी वक्ते, उत्तम कवि, प्रथितयश नाटककार व लेखक, श्रीयुत प्रल्हाद के. अत्रे यांनीं आम्हां अनोळखी नवोदित लेखकांच्या पुस्तकाला सुंदर प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों. चित्रकार चिटणीस यांनीं नामनिर्देश न करण्याबद्दल बजाविलें आहे तरी आमच्यानें उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. शेट दा. सा. यंदे यांनीं पुस्तकप्रकाशनाचें कामीं दाखविलेल्या आस्थेबद्दल त्यांचेही आभारी आहों.

दत्तात्रय दामोदर पेंडसे.

दत्तात्रय पांडुरंग पेंडसे.

# हिंदु विद्यार्थी-वसतिगृह,

## मुरुड-जंजिरा.

आजकाल मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न भयंकर बिकट होत चालला आहे. खेडेगांवांतील लोकांस दूरच्या शहरांत मुलें ठेवणें प्रायः शक्य नसतें, तर शहरांतील मध्यमवर्गांतील लोकांससुद्धां तेथील शिक्षण फारच महाग पडत असल्यानें आपल्या मुलांचें शिक्षण पुरें करणें कठीण होत आहे. मुरुड येथें मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण अगदींच अल्प खर्चांत होतें; परंतु राहण्याची चांगली सोय नसल्यानें पराठिकाणच्या लोकांस त्याचा फायदा घेतां येत नसे; ती अडचण वसतिगृहानें दूर केली आहे.

मुरुड कोंकण किनारी नारळी पोफळींच्या बनांत वसलें असून येथील रम्य सृष्टिसौंदर्य, शुद्ध हवा, अभ्यासास अनुकूल असें प्रशांत वातावरण, शहरी मोहांचा अभाव वगैरे अनेक गोष्टीमुळें मुलांना शिक्षणाकरितां ठेवण्यास अतिशय उत्कृष्ट ठिकाण आहे.

वसतिगृहांत व्यवस्थापक ह्मणून हायस्कूलांतील एक शिक्षक रहात असून विद्यार्थ्यांची, चांगल्या संवयी, अभ्यास, आरोग्य वगैरे बाबतींत प्रगति होण्याकडे दक्षतेनें लक्ष दिलें जातें. अन्न शाकाहारी पद्धतीचें उत्तम असूनसुद्धां फीसह मासिक खर्च १०-१२ रुपये येतो; मुलांची संख्या वाढल्यास याहून कमी येईल. तरी पालकांनीं वसतिगृहांत मुलें ठेवण्याची त्वरा करावी.

सूचनाः—सविस्तर माहितीकरितां सेक्रेटरीकडे लिहावें:—

द. ह. उपाध्ये (वकील)
सेक्रेटरी-हिंदु एज्युकेशन सोसायटी,
मुरुड-जंजिरा, जि. कुलाबा.

# अनुक्रमणिका

## भाग १ ला


| अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | वाफ | १—४ |
| २ | सुपारी | ५—७ |
| ३ | पगडी | ८–१० |
| ४ | जांवई | ११–१३ |
| ५ | फुलें | १४–१६ |
| ६ | वैशिष्ट्य | १७–१८ |
| ७ | हा ही हें | १९–२१ |
| ८ | प्रश्न | २२–२४ |
| ९ | सत्य-सृष्टि आणि कल्पनेचें साहचर्य | २५–२७ |
| १० | आम्रवृक्षांचा कोंडमारा | २८–३१ |
| ११ | संशय पिशाच्च ! | ३२–३४ |
| ११ | पौर्णिमा व अमावास्या | ३५–३६ |
| १३ | ग्रंथ व मूर्ति | ३७–३९ |



लेखक—

श्री. द. दा. पेंडसे,

# अनुक्रमणिका.

—*×○×*—

( भाग २ रा पृष्ठ ४० वें )


| अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | आंबा | ४१–४२ |
| २ | ऑफिस | ४३–४५ |
| ३ | चुंबन | ४६–४७ |
| ४ | बिजवर | ४८–५० |
| ५ | ‘ मोटारड्रायव्हर ! ’ | ५१–५२ |
| ६ | स्त्री ! | ५३–५४ |
| ७ | ‘ इश्य ’ | ५५–५६ |
| ८ | स्मशान | ५७–५८ |
| ९ | डोळा | ५९–६१ |
| १० | नारी जात | ६२–६३ |
| ११ | स्त्रियांचे गाल | ६४–६५ |
| १२ | रडणें | ६६–६७ |
| १३ | धर्मभगिनी | ६८–६९ |
| १४ | न्हावी | ७०–७१ |
| १५ | कवीची बायको | ७२–७३ |



लेखक—

श्री. द. पां. पेंडसे,

स्थळ प्रत
सं. निबंध ४१३
ता. १५।८।३४
क्रमांक ७२३६
५२५१.

# ' संगम '

( लघुनिबंध संग्रह )

## १ वाफ.

भगवान् सहस्ररश्मि व सागरनिवासी जलदेवी यांचें हें अपत्य. जन्मतांक्षणीं जलदेवीनें तिला हवेच्या स्वाधीन केलें. सवतीच्या हातीं तिनें मुलीला खुषीनें दिलें असें नाहीं. पण मुलगीच ऐकेना ! हवेची सून....वाऱ्याची पत्नी....धूळ हिच्याशीं वाफेची फारच गट्टी झाली. धुळीनें वाफेचें अदृश्य स्वरूप पालटून तिला अगदीं नवीन रूप दिलें. वाफ सुंदर झगे नेसूं लागली. कधीं कधीं स्वर्गीय रंगाचे कपडे घालून ती मिरवत असे. अशावेळीं वडिलांच्या करस्पर्शानें ती फार प्रसन्न होई. पुढें तिचा स्नेह तिचा सावत्र भाऊ वारा याच्याशीं फार झाला. वाऱ्याचा स्वभाव अतिशय चंचल. तो कधीं मिनिटभर स्वस्थ बसावयाचा नाहीं. सारखा भिरिभिरी धांवावयाचा. तीहि त्याच्याबरोबर निःशंक मनानें धांवे. त्याच्याबरोबर वावरतांना सावत्र नात्याची तिच्या मनांत शंकासुद्धां येत नसे.

तिला वाटे सूर्य बाबांच्या अगदीं जवळ जावें. म्हणून ती खूप-खूप उंच जाई. पण हवेच्या घराच्या उंबरठ्यापलिकडे तिला जातां येईना. वडिलांच्या घरापर्यंत आपण पोंचूं शकत नाहीं असें पाहून सूर्य दिसत नाहींसा झाला कीं ती खालीं येऊन अश्रू ढाळी. सारे

अचपळ खेळ टाकून देऊन दऱ्याखोऱ्यांत लपून बसे. सूर्य पुन्हां वर आला कीं, पित्याला भेटावयाची तिला पुन्हां उत्कंठा होई. ती पंख फडफडवून भुर्रकन वर भरारी मारण्याचा यत्न करी.

“ हिचें रूप कोणासारखें झालें आहे ? ” हा प्रश्न वाफेला पाहून जो तो करी. लहानपणीं मूल कोणा सारखें दिसतें हें सांगणें कठीण. कोणी म्हणे ‘ आई जलदेवी सारखी. ’ कोणी म्हणे ‘ छे, पित्यासारखी. ’ कोणी म्हणत ‘ सावत्र आई हवा हिच्या सारखी !’

तिनें वाऱ्यावर स्वार होऊन घोड्या–घोड्यांचे खेळ खेळावे, स्वच्छंदानें गिरके घ्यावे. आतां तिचा वर्ण आईसारखा दिसे. वडिलांचें तेज पण तिच्यांत दिसें. कधीं कधीं ती तेजाचा चाबूक सप्कन उगारून सिंहासारखी गर्जना करी.

वायु–दादाबरोबर ती अनेक वेळां हिरव्यागार भूमी–भागावरून प्रवास करी. पण त्या सौंदर्याचा मोह तिला कधींच झाला नाहीं. ती म्हणे “ अंऽऽ. हें काय परपुष्ट सौंदर्य ! जलमाता व सूर्यबाबा प्रसन्न नसतील तर या भिकारडीचें काय रूप होईल तें ठाउक आहे !”

बेगुमानपणें ती अशीच हिंडत असतां भूमीचा अक्राळविक्राळ पुत्र पर्वत तिला आडवा आला व तिला आपल्या बाहुपाशांत पकडण्याचा यत्न करूं लागला. ती रागावून कडाडूं लागली. वृक्षांचें भस्म करून, शिलाखंडांना भेदून, तिनें आपल्या तेजाचें प्रत्यंतर दाखविलें. शेवटीं ती रडूं लागली, पण पर्वत वाटेंतून हलेना !

पर्वतानें आडवलें तरी आपला पाठीराखा भाऊ वारा आपल्या बरोबर आहे, त्याच्या साह्यानें पर्वताच्या माथ्यावर मिरीं वांटून आपण दिमाखांत सहज निघून जाऊं असा तिचा समज होता. आजपर्यंत बारीक सारीक पर्वतशृंगांना तिनें असेंच जुमानलें नव्हतें. पण आयत्यावेळीं वाऱ्यानें तिला दगा दिला व तिला तेथेंच एकटीला सोडून पर्वताशीं कांहीं गुणगुणून वरून चालता झाला !

काय करावें ? नको त्या व्यक्तीच्या हातीं पडण्याची वेळ आली म्हणून तिला वाईट वाटलें. पर्वताच्या स्पर्शानें तिच्या स्वरूपांत अगदीं क्रांति करून टाकली. ती आतां जलदेवीसारखी दिसूं लागली. जलदेवीची लहान प्रतिमाच दिसे ती !

कपाळावर हात देऊन रडत बसणें तिला पटेच ना. यांतून कांहींतरी उपाय काढला पाहिजे. चैतन्यरहित काळ्याकभिन्न पर्वताचा तिला भयंकर तिटकारा येई. तरीपण ‘ पदरीं पडलें आणि पवित्र झालें ’ असें मनांत आणून त्याच्याशीं जमल्यास बरें म्हणून ती त्याच्या अंतरंगाचा ठाव घेऊं लागली. पण त्याचें पाषाणहृदय पाहून त्याच्याबद्दल साधा जिव्हाळा सुद्धां तिला वाटेना. त्या भिकाऱ्याचें दारिद्र्य पाहून आईच्या सागर–निवासांतील रत्नांची आठवण होऊन तिला कसेसें वाटे. तिनें ‘ ओं देवा असला ठेवा ’ अशा पर्वताचा त्याग करण्याचें ठरविलें. ती पर्वताच्या हातून निसटण्याच्या मार्गास लागली.

अहल्येला गौतमानें तिच्या चंचलपणामुळें शिळारूप बनवलें. पर्वतानें पत्नीचा चंचलपणा पाहून तिला शिलास्वरूपी बर्फ केलें. आपल्या मुलीवर होत असलेली बळजोरी सूर्यनारायणानें पाहून तिला तिचें मूळ रूप दिलें. नदीचें रूप मिळाल्यावर तिचा बंडखोरपणा सुरूं झाला !

पर्वतानें पत्नीला आडवण्याची कमाल केली. दरीच्या तळघरांत कोंडलें ! पण तिचा तेथून सुटण्याचा निश्चयच झालेला. ‘ क ईप्सितार्थःस्थिरनिश्चयं मनः पयश्च निम्नाभिमुखं प्रतीपयेत् ’ ती धाड धाड उड्या मारी. देहाची सुद्धां पर्वा करीना. रागानें लाल होऊन फोंफावत होती ती !

पर्वताला स्वतःला नदीला आडवितां येईना, तेव्हां त्यानें आपली आई भूमि हिला भरीस घातलें. सासूबाईनीं सुनेला वळवण्याची

शर्थ केली, सरोवराच्या कोंडींत डांबलें; पण त्या जड–भूमीला ही वायुगति कसची दाद देते !

नदी झपाट्यानें आईकडे निघाली. पण आईचें घर जवळ येतांच तिच्या मनांत वेगळे विचार येऊं लागले. पर्वताच्या स्पर्शानें आपणांमध्यें झालेल्या फरकामुळें आई आपणांस ओळखील का ? आपली बंडखोरी आईला संमत होईल का ? शंका कुशंकांनीं तिचें मन व्याकूळ होऊन तिचें पाऊल उचलेना !

आई भेटल्यावर तिच्या साऱ्या शंका फोल ठरल्या. आईनें तिला कडकडून मिठी मारली. आईच्या प्रेमळ स्पर्शानें तिला भरून येऊन तिनें वाऱ्याची दगाबाजी, पर्वताचा अतिप्रसंग, भूमीचा सासुरवास, सारें सांगितलें. जलदेवीला पर्वत व भूमीचा फार राग आला व त्यांचा समाचार घेण्याचें तिनें ठरविलें. तेव्हांपासून त्यांचा व तिचा जिथें जिथें संबंध येईल, तेथें तेथें ती त्यांना धडका देते. वाऱ्याच्या दगाबाजीचें तिला फारसें आश्चर्य वाटलें नाहीं. ती म्हणाली "सावत्र भाऊच तो, तो असंच करायचाचा ! त्या भूमीच्या पोरीनें, त्या धुळीनेंच, पर्वत–भावाच्या हातांत नेऊन टाकण्याची कल्पना या वाऱ्याच्या मनांत भरवली असेल. तूं आपली साधी आहेस, तुला त्यांच्या कारवाया कळल्या नाहींत. तूं इतःपर त्या नवरा बायकोच्या नादीं मुळींच लागूं नकोस. ये आपली, तूं माझ्या कुशींत. "

नदी समुद्राला मिळाली, आणि हें सारें विसरली !

निसर्ग खदखदां हांसला !

पूर्वक्रम सुरू झाला !

---

# सुपारी

सुपारी खाणें ही एक करमणूक आहे. ती जेवणानंतर खाल्ली असतां मुखशुद्धि चांगली होते हें जरी खरें असलें, तरी फक्त मुखशुद्धीकरितांच सुपारी खाणाऱ्या व्यक्ती विरळाच. वाटेल तेव्हां तोबरा भरलेला आहे व कुत्रा जशीं हाडें चघळीत असतो, त्याप्रमाणें सुपारीचीं खांडें चघळण्याची क्रिया चालली आहे, असें दृश्य आपणांला केव्हांहि दिसतें. पुष्कळांना खांडें चघळण्याची अशी खोड लागून राहते कीं, त्यांना बारीक सुपारी चालत नाहीं.

सुपारी फोडणें ही एक कला आहे. नवशिका त्या भानगडींत पडेल तर त्याचा शुक्राचा उंचवटा जायबंदी होण्याची वेळ येईल. एकाच जाडीचे रोठ्याचे सारखे काप काढून हातांतल्याहातांत रोठ्याचा दुप्पट आकार करणारे लोक यांतील दर्दी होत.

श्रीवर्धनी सुपारी उत्तम म्हणून प्रसिद्ध आहे. पण आमचेकडे हा उत्तम माल असून आम्हीं गोंवादगडी, अगर कलकत्तेवालीच सुपारी खाऊं व वरनी मखलाशी करूं कीं, ‘ छे बुवा ! आमची सुपारी पानांत जमत नाहीं. ’ आमचा परधार्जिनपणा लपवण्याची ही एक पद्धत, दुसरें काय ?

सुपारी हें व्यसन लोकमान्य आहे. आमचें तें राष्ट्रीय व्यसन आहे, असें म्हणण्याइतकें तें सर्वसाधारण आहे. किंबहुना तें व्यसन नाहींच. सुपारी खाणाऱ्या इसमाला व्यसनी म्हणून म्हटलें जात नाहीं. प. वा. लोकमान्य टिळकसुद्धां सुपारी खात.

सुपारीचा संबंध रोठा दांतांखालीं रगडणाऱ्या वीरापासून तपकिरीसारखी वस्त्रगाळ पूड खाणाऱ्या नाजुकापर्यंत अनेक व्यक्तींचे प्रकार सुपारीबाजांत आहेत. कुटलेल्या सुपारींत बिब्याची,

ओंव्याची, मसालेदार, तिखटी, असे नानाप्रकार येतात. आमचे एक मित्र सुपारीला पेंड म्हणतात. ओंव्याच्या सुपारीला ' बाळंत्या ' वास येतो असें त्यांचें मत आहे.

भुताटकीच्या प्रांतांत अशीं ' झाडें ' आहेत कीं, त्यांच्या अंगांत खवीस, समंध, जखीण, अशीं भुतें संचारतात. सुपारी हें तसेंच एक ' झाड ' आहे. भटजीनें आवाहन केलें कीं, गणपतीपासून कोणताहि देव तिच्या अंगांत येतो !

भांडणें लावणारी चीज म्हणजे नारद या अर्थानें सुपारीला नारद म्हणतां येईल. कोंकणांतील मानाच्या सुपारीनें कितीं भांडणें लावलीं आहेत त्यांचें जरी सहज विहंगमावलोकन केलें तरी माझ्या वरील विधानाची सत्यता पटेल.

सुपारी सहधर्मचारिणी आहे. माझें हें म्हणणें " जिवंत बहुबोलकीं अतिसुरम्य हीं उत्पलें " अशा स्त्रियांना कदाचित् कडू वाटेल. पण माझें मत खरें कीं खोटें हें त्यांनीं पुढील प्रसंगावरून तपासावें. बन्याबापूची बनी कमाल मर्यादेपर्यंत वाढून अगदीं गळ्याशीं लागली होती. मुलगी दाखवण्यास नेली व तसेंच लग्न जमलें. मुहूर्त पण लगोलग व जोडप्याला लाभेल असा एकच होता. बायकामाणसें आणावीं तर मुहूर्त जातो, अशा पंचायतींत बापू सांपडले. अशा आणीबाणीच्या वेळीं सुपारीनें समयसूचक कैकयीप्रमाणें बाजू सांवरली व लग्न पार पडलें. भांडणेंही झालीं नाहींत. वरमायेचा प्रतिस्पर्धी मुकी सुपारी असल्यामुळें ' दोन हात ' होऊं शकले नाहींत व त्यामुळें भांडणाची टाळी वाजणें अशक्य झालें !

बापूंनीं बनीचें लग्न कनवठीला सुपारी लावून उरकल्याचें बाळ्याला कळलें, तेव्हां तो आईला म्हणाला " आई, बापू नसतांना तुला सुद्धां माझें लग्न सुपारी कनवठीला लावून करतां येईल. "

आईनें खेकसून चापटपोळीनें उत्तर दिलें तेव्हां बाळ्या आपली काय चूक झाली याचा विचार करूं लागला. आईच्या ऐवजीं सुपारी चालली, पण बाबांच्या ऐवजी सुपारी कशी चालेल? नारळ पाहिजे. त्यानें चुकीची दुरुस्ती करून आईला प्रश्न विचारला कीं, नाहीं तें कळलें नाहीं !

माझी व सुपारीची जानपछान माझ्या मुंजींत झाली. त्या गोष्टीची मला चांगली आठवण आहे. आमच्या ( हल्लींच्या ) अक्कासाहेब सौ. यमूताई यांच्या चोंबडेपणामुळेंच ही आठवण राहिली. झालें काय, पळसुल्याच्या दिवशीं भटजीनें आईला एक सुपारी दिली व आईनें ती कपाटांत व्यवस्थित नेऊन ठेवली. त्या सुपारींत असें महत्वाचें आहे तरी काय, हें पहाण्याकरितां मी ती सुपारी कपाटांतून चोरून काढली. पिंवळें सूत उलगडून पाहतों तो साधी सुपारी. पण आंत कांहीं विशेष असेल म्हणून ती फोडली. पण आंत पहातों तों नासकी सुपारी ! ( त्या वेळच्या ) यमिटलीनें माझा शोध आईला सांगून मला मार देवयला, तो प्रसंग अजून डोळ्यापुढें येतो.

कांहीं लोकांना सुपारी फार लागते. ते ती खातात, पण त्यांना ती लागली म्हणजे कानशिलें लाल होऊन त्यांना ‘ पाणी पाणी ’ करण्याची वेळ येते !

# ३ पगडी

त्या झिलमिळ्या, ती कोय, तो नारळाच्या चवडासारखा वरील आकार व जवळच चित्रविचित्र नकशी, हें पगडीचें आवश्यक वहिरंग आहे. आम्ही रूढीप्रिय आहोंत, याची जागती निशाणी म्हणजे पगडी ! कोण्याकाळीं आमच्यावर नागांचें राज्य होतें, त्या वेळच्या शिरस्त्राणाचें हें अवशिष्ट रूप आहे. जुन्या सांप्रदायांची आस्थेनें जोपासना करण्याच्या आमच्या अशा प्रवृत्तीमुळें इतिहास-संशोधकांना इतिहासाचे धागेदोरे जुळविण्याला साधनसामुग्री मिळणें शक्य होतें.

मन मानेल तेव्हां आपला पक्ष फिरवणाऱ्या माणसाला पगडी फिरव्या अगर टोपी फिरव्या म्हणतात. ' पगडीफिरव्या ' पेक्षां ' टोपीफिरव्या ' हाच शब्द वास्तविक जास्त योग्य वाटतो. टोपी कशी चटकन व कोणालाहि फारसें कळणार नाहीं अशा तऱ्हेनें फिरवतां येते; पण पगडी उलट चोंच करून घातली तर तें कृत्य दिसतेंहि चमत्कारिक व डोळ्यांत भरतेंहि लवकर. पण कदाचित् पगडी वापरणारांत ही वृत्ति मोठ्या प्रमाणांत आढळत असेल व म्हणूनच टोपी वापरणारांची संख्या जरी मोठी असली, तरी या कारणानें दोघांतील ' रंग पालटणाऱ्यांची ' संख्या सारखी भरत असेल व त्यामुळें दोन्ही वाक्प्रचार रूढ झाले असतील !

' शीर सलामत तों पगड्या पचास ' अशी म्हण आहे. पण ही म्हण श्रीमंती वातावरणांतून पैदा झाली असावी. गरिबाचें शीर सलामत असूनहि पोटाची खळगी भरण्याची पंचाईत पडते, तेथें पगडी कोठून आणावी त्यानें ? अंग झांकण्याचीच बिचाऱ्याला विवंचना असते तेथें पन्नास पगड्यांची गोष्टच नको !

पगडीचा बडेजाव फारच केला जातो. एकाच मनुष्यानें एकदां पगडी व एकदां टोपी घालून सारख्या समारंभांना जावें म्हणजे मान-पानांत पडणारा फरक पाहणें त्याला मनोरंजक होईल. वकील म्हटला कीं त्याला पगडी हवीच, हा जवळजवळ अलिखित दंडकच आहे !

महाराष्ट्रियांपैकीं बहुतेक सर्वजण हल्लीं टोपीच वापरतात. त्यांच्या आयुष्यांत त्यांची व पगडीची गांठ पडण्याचें कारण नसतें. परंतु लग्नविधीच्या वेळीं त्यांना पगडी घालण्याचा हटकून ' प्रसंग ' येतोच. सासऱ्यांनीं लग्नांत आम्हांस चांगलीच टोपी दिली, असें म्हणण्याची जांवईबापूंना जागा राहूं नये ही दूरदृष्टि या प्रघातांत असल्यास न कळे !

पगडी वापरण्याला सनद लागते असें नाहीं. एखादा भिकारी अगर दहा वर्षांचा भटाचा मुलगा सुद्धां ती हक्कानें वापरूं शकतो. मात्र वापरणाराला मारून मुटकून म्हणा, अगर आपोआप म्हणा, थोडा शिष्टपणाचा आव आणावा लागतो !

महाराष्ट्रियांचें शिरस्त्राण कोणतें ? पगडी, फेटा कीं टोपी ? कोणतें कां असेना, आम्हांला पगडी पाहिली कीं आपुलकी वाटते यांत शंका नाहीं. कदाचित् असें वाटण्याचें कारण महाराष्ट्राचे अव्वल पुढारी, न्या. रानडे, लो. टिळक, ना. गोखले, चिपळूणकर, आगरकर, तात्यासाहेब केळकर वगैरे सारे लोक पगडीलाच डोक्यावर चढवणारे दिसतात हें असेल. ना. खापर्डे यांच्यासारखे कांहीं लोक थेट विलायतेपर्यंत फेटा पोचविणारे असले, किंवा बाबासाहेब जयकरां-सारखे कांहींजण टोपीला मान्यता देणारे असले, तरी फेटा व टोपी जरा एकांडींच वाटतात. एखाद्या महत्वाच्या फोटोंत दोन चार तरी पगड्या दिसल्या कीं, ' आम्हीं आहोंत ' असें वाटून अंगावर मूठभर मांस चढतें !

टोपी घातलेल्या मनुष्याकडे पाहिलें कीं धाब्याच्या घराची आठवण होते. पगडीवाला इसम मशीदीची कल्पना डोक्यांत उभी करतो !

जे जांवईबापू पाटीवरील श्री रोडावत जाऊन पत्रांत अतिशय वाळल्याबद्दल रडले, ते जर मराठेशाही अथवा पेशवाई पगड्यांकडून आजच्या पगड्यांकडे नजर टाकतील तर ओक्साबोक्सी रडूं लागतील इतकें पगड्यांच्या आकारांत परिवर्तन झालें आहे.

किरमिजी, डाळिंबी, लाल, वगैरे पेटंट रंगांच्या पगडीबद्दल माझे वरील विचार आहेत. ' पीत्या पगडी ' बद्दल मी कांहींच लिहीत नाहीं. नाहींतर फट् म्हणतां ब्रह्महत्या व्हायची ! व पोलिसी कायदा उद्दत्त म्हणून पुढें उभा राहावयाचा !

८२३५ 
सं. विश्रा ८९
ता. १५।८।३३
हा. ग्रं.

# ४ जावई

बावळटपणाची, अक्कलशून्यतेची, चक्रमपणाची लागेल ती गोष्ट या प्राण्याच्या नांवाला जोडली तरी निभून जाते. या जगांत कांहीं जाती अशा आहेत कीं त्या बिचाऱ्यांवर कोणीहि तोंडसुख घ्यावें. त्या जातींत जांवई बोवांचा नंबर बराच वर लागेल. नाटकांतून हास्यास्पद पात्र म्हणून कवि, भट, मारवाडी, कानडी अशा प्रकारचे सनदी प्राणी आहेत. या पंक्तींत मास्तरांनाहि ओढलें जाण्याची वेळ येऊं लागली आहे. हे प्राणी असे आहेत कीं बापड्यांची लागेल त्यानें, वाटेल तशी, मनमानेल तेव्हां टर उडवावी ! जांवयाचा अजून तसा उपयोग होत नसला तरी लोककथांतून त्यांचा चांगलाच समाचार घेतलेला आहे. ते, सांवलीसुद्धां बरोबर नसावी म्हणून तिला वस्त्रें अर्पण करणारे महात्मे; आवडलेली काकवी सुद्धां हावरटपणा पदरीं येतो म्हणून न खाणारे व मागाहून अंग माखून कापसांत लोळणारे विक्षिप्त; प्रत्येकाशीं बोललें नाहीं तर जांवईबापूंवर माणूसघाणेपणाचा आरोप येतो म्हणून भलत्याला भलतेच प्रश्न विचारून हास्यास्पद होणारे पंडित; सूर्याचें पिल्लूं गंजींत लपविणारे शिरोमणी ! भलत्याच जागीं बसूं नये म्हणून कपाटावर बसणारे दीड शहाणे; धिरड्या ऐवजीं घसरडें सांगून बायकोची कणीक मऊ करणारे विसरभोळे; रातांधळें असल्यामुळें मांजराऐवजीं सासूला मारणारे व रात्रीं विहिरींत पडणारे वीर; एक ना दोन, नाना प्रकार ! त्या कथा, जांवईबापू म्हणजे अकलेचे खंदक असेंच सांगतात !

मागच्या जन्मींचा सावकार या जन्मीं जावयाच्या रूपानें जन्माला येत असावा. नाहींतर श्वशुरांकडून हिकमतीनें माया लांबविण्याचें काम

त्याला इतक्या यशस्वी रीतीनें करतां आलें नसतें. जामाताला दहावा ग्रह असें म्हणण्याची वेळ त्याच्या पीडेमुळेंच आलेली आहे.

जांवई म्हणजे ' बोरांतली कीड ' असें त्याच्या सुंदरपणाला अनुलक्षून बोलतात. पण या म्हणण्यांत तसा अर्थ ध्वनित होत नसून खवचटपणाचाच वास येतो. पोंखरण्याची कला दोघांना सारखीच साध्य आहे हाच गर्भित हेतु !

जांवई बनणें हें एक क्वालिफिकेशन आहे. म्हणूनच त्याला नंतर राव, पंत, साहेब अशी उपाधि मिळूं लागते. ' सोम्या गोम्या ' शिवाय उभ्या जन्मांत दुसरें नांव मिळालें नाहीं, तोच सोमनाथपंत, गोमाजीपंत असा कोणी तरी ' बडा ' बनतो.

सासूबाई नसतील तर जांवईबापूंची तैनात व प्रतिष्ठा शंभर टक्के कमी येते. प्रत्यक्ष मुलाबद्दल आईला जें प्रेम वाटतें त्यापेक्षां कांहीं निराळेंच आपुलकीचें व जिव्हाळ्याचें प्रेम जांवयाबद्दल वाटतें. जांवई बापूंना जे प्रणयाचे खेळ घरीं करण्याची चोरी असते ते त्यांना सासुरवाडीस मोकळेपणानें करतां येतात. तेच प्रकार मुलानें सुनेशीं केलें तर केवढा गहजब होतो ! स्त्री जातीच्या अंतरंगाचा हा कप्पा जरा विलक्षणच आहे !

" कृष्णाजीपंत सहस्रबुद्धे यांचें घर कोणतें ? " असें विचारीत एक तरुण आपल्या बहिणीच्या ठावठिकाणाची पूसतपास करीत होता. जो तो म्हणे ' कृष्णाजीपंत सहस्रबुद्धे ? ' नाहीं बोवा या गांवांत कोणी. शेवटीं एका विचक्षण गृहस्थानें जरा खोलांत शिरून त्या युवकाकडून सर्व माहिती घेतली, व ' क्ष ' गावांतील मुलगी गावांत कोणाकडे आली आहे याचा विचार केला. ' अरे, कुशा-जोशी ! ' तो एकदम उद्गारला. तो तरूण जरा दचकलाच. पदवीच्या आहेरानें असा गोंधळ होईल ही त्याला काय कल्पना !

कुशा जोशी म्हणून जर तो विचारता तर रस्त्यावरच्या शेंबड्या पोरानें सुद्धां त्याला पत्ता दिला असता !

जांवई होणें ही एका काळीं जेवढी सुखाची बात होती तेवढी आतां नाहीं. विवाहोत्तर प्रेमाच्या पूर्वींच्या काळीं पोरी दाराशीं चालून येत, हुंडाहि घेतां येई. पण हल्लींच्या प्रेमोत्तर विवाहामुळें हल्लींच्या उपवधूंना सासऱ्याच्या दाराशीं जावें लागतें. हुंड्याची बातच नको. पोरगी दिली हेच उपकार ! पूर्वींच्या जांवयांपेक्षां या जांवयांच्या रुसण्याला पण किंमत कमीच. पूर्वीं सासरे, सासू सारे भजनीं लागत पण आतां जांवयांच्या पुढें ' कुसुम ' उभी राहते. जांवई नांगी टाकून मूग गिळतात !

अकबर बादशहा सर्व जांवयांना फांशीं द्यावयास निघाला होता. खरोखरच्च जांवयांच्या चढेलपणामुळें रागाचा पारा डोक्यांत मावत नाहींसा होतो. सीधा मनुष्यसुद्धां जांवईपणाच्या कैफांत विचित्र वागतो.

एका ६० वर्षांच्या प्राण्याच्या शेवटल्या मुलाचें लग्न होतें. त्यांचे दहा जांवई कार्याला उपस्थित होते. त्यांचा सर्वांत मोठा जांवई चाळीस वयाचा होता व त्यालाहि जांवई आलेला होता. लग्नाच्या पसाऱ्यांत याचा मानपान जरा कमी पडला. झालें, पापड मोडला ! जांवई कोठे निघून गेले. लग्नाच्या ऐन घाईंत श्वशुर जांवयांची बाबा पुता करीत समजी करूं लागले. जांवयांच्या सत्तेची प्रतिष्ठा मला या अतिप्रसंगावरून चांगलीच कळली !

# ५ फुलें

जगांत ज्या आनंददायी वस्तु आहेत त्यांत फुलांना अग्रस्थान द्यावें लागेल. श्रीमंत गरीब, ज्ञानी अज्ञानी, दुःखी सुखी, पापी पुण्यवान् अशा सर्व लोकांना पंक्तीप्रपंच न करतां आनंद देणारी ही चीज आहे. आनंदमय परमेश्वराच्या अव्यक्त स्वरूपाचा हा पृथ्वीवरील अवतारच असावा असें वाटतें.

कडक थंडीचे दिवस असोत वा प्रखर उन्हाळा असो अगर मुसळधार पाऊस असो, सत्पुरुषाप्रमाणें आपलें व्रत चालविण्यांत तें कधींहि कसूर करीत नाहीं. हंसतमुखानें काळाचे तडाखे सहन करीत जगाकरितां जगण्याचें व जगाला आनंदी करण्याचें याचें त अखंडित चालूंच.

स्वर्गांत अमृत असेल. पण मृत्युलोकचीं फुलें त्यापेक्षां गुणांत कांकणभर सरस भरतील. अमृतामुळें अजरामरत्व येतें. अजरामर करण्याची शक्ति फुलांत आहे. फुलांतून फळें, फळांतून बीजें, बीजांतून वृक्ष अशा परंपरेनें फुलेंच वृक्षांना अजरामर करतात. शिवाय फुलांचा वास व रंग अमृताजवळ नसण्याचाच जास्त संभव.

दुधांत साखर असावी व त्यांत केशर पडावें. ' अधिकस्य अधिकं फलम्. ' तद्वत् सुंदर रूप, त्यांतच वास, जोडिला मधहि; मग अशा डौलदार आकृति पाहून आनंद कां होऊं नये ?

कोणत्याहि सुंदर कोमल वस्तूला उपमान म्हणून फुलानांच पाचारण करावें लागतें. मुलें व फुलें ही जोडी तर अभेद्यच आहे. सुकुमार स्त्री म्हणजे फूल; हळुवार अंतःकरण म्हणजेहि फूलच. स्त्रियांच्या व मुलांच्या गालांवर फुलेंच. फूल सर्वव्यापी प्रसन्नताच आहे !

चित्रांतील आलेख्यांना वस्त्रांनीं नटवण्यापेक्षां कांहीं चित्रकार फुलांनींच नटवतात यांतील इंगित हेंच असेल कीं कोमल कायेला सुयोग्य असें आभरण त्यांना फुलांशिवाय सांपडत नसावें.

फुलें म्हणजे पूर्ण विकास. किती सुंदर व परिपूर्ण होतां येईल याची मूर्तिमंत मर्यादा म्हणजे फूल. एखाद्याचा संपूर्ण विकास किंवा परमोच्च उत्कर्ष पाहून हृदयाला आनंद होतो, तो आनंद उन्मीलित फूल पाहून होतो.

डोळ्यांना आनंद देणारे विविध रंग व त्यांच्या छटा, सुमधुर आल्हाददायक सुवास, नाविन्यपूर्ण डौलदार आकार, गोड लाडिक अंतरंग, सुकोमल स्वरूप, निर्व्याज हंसरी मुद्रा यांचा कौशल्यपूर्ण मिलाफ देवानें फुलांत साधला आहे.

' समानशील लोक एकत्र येतात ' ही गोष्ट फुलांचा व फूल-पांखरांचा स्नेह पाहून पटते. फुलांच्या रंगीबेरंगी पाकळ्या व फुल-पांखरांचे नानारंगी पंख सारखे नाहींत असें कोण म्हणेल ?

फुलांचें विश्व किती चमत्कारिक ! त्यांत पहांटे उमलणारा देवतरु आहे. अरुणोदयाबरोबर निःश्वास सोडणारें पद्म आहे. उजा-डतांच उघडणारा सोनचाफा, जास्वंद आहे. रात्रीं जादू पसरणारी रातराणी पण आहे. संध्याकाळीं एक रंग, सकाळीं दुसरा रंग अशी टोपीफिरवी मधुमालती आहे. दुपारी झांकली मूठ उघडणारा सोनटाकाहि आहे. कांहीं फुलें इतक्या नियमित वेळींच फुलतात कीं घड्याळें त्यावरून लावावीं. फुलांच्या राज्यांत सुकुमार नाजुक शिरीषफुलापासून राकट कागदीफुलापर्यंत अठरापगड जाती आहेत. कडुनिंबाच्या अणोरणीयान् फुलांपासून महतो महीयान् अशीं कमळें आहेत. गोकर्णाला एकच पाकळी तर शेवंतीला सहस्र पाकळ्या ! मिया मूठभर व दाढी हातभर अशीं कांहीं वेलींचीं फुलें आहेत. वैचित्र्याचा अजबखाना म्हणजे सुमनसृष्टी !

फुलांना अंतःकरण असावें. नाहींतर इंदुमतीच्या दुःखानें अशोकानें फुलें कां गाळलीं असतीं ? बागेंत कोपऱ्यामध्यें पानाआड दडलेलें गुलाबाचें फूल पाहून रुसलेल्या व कोपऱ्यांत जाऊन बसलेल्या बालकाची आठवण होते. प्रिय व्यक्तीच्या अंतःकरणाची स्निग्धता बगीच्यांतून फिरतांना प्रत्ययास येत नाहीं कां ?

फुलांच्या राज्याचें ' पृथ्वीवरील स्वर्ग ' याच अन्वर्थक शब्दांनीं वर्णन करतां येईल !

# ६ वैशिष्ट्य

जगांत जवळजवळ दोन अब्ज मानवजात आहे. त्यांत एका-सारखा हुबेहुब दुसरा प्राणी निवडून काढणें अशक्य आहे. याचें कारण प्रत्येकाचें वैशिष्ट्य. सवतासुभा हा मनुष्याचा जन्मसिद्ध हक्क आहे !

तुम्ही कोणत्याहि माणसाकडे पहा. त्याची चालण्याची ढब, बोल-ण्याची ढकब, हंसण्याची पद्धत, लिहिण्याची धाटणी रडण्याचा स्वर, हावभावांची तऱ्हा अगदीं स्वतंत्र असते. एकाच रक्तमांसाचीं भावंडें घेतलीं तरीं त्यांत फरक असतोच. वैधर्म्य हाच सृष्टीचा प्राण आहे. अक्षर, हस्तरेषा, तोंडवळा यावरून मनुष्याचे स्वभाव वर्तवितात तसेंच हंसणें, बोलणें, चालणें यावरूनहि स्वभाव सांगतां येईल.

मुलांचा स्वभाव उत्तम करण्याकरितां कांहीं उपाय आहेत, परंतु हे उपाय जेथें एकसमयावच्छेदेंकरून सर्व मुलांवर केले जातात अशा रशियांतील शिशुगृहांतून सुद्धां एकच छापाचीं मुळें निघत नाहींत. स्वभाव बनवण्यापेक्षां आपोआप बनत असतो. कोंवळें झाड वांकवितां येतें पण त्याला सुद्धां मर्यादा आहे, हेंच याचें कारण.

" स्वभावाला औषध नाहीं, " ' जे गुण बाळां ते जन्मकाळां ' या म्हणींवरून स्वभाव हा न बदलणारा आहे हें दिसतें. नदी व स्वभाव यांना त्यांच्या कलानें घेऊन थोडें वळवतां येईल पण प्रत्यक्ष विरोधाला ती टक्करच मारतील. विरोध कमकुवत असेल तर तीं त्याला जुमानणार नाहींत. शिरजोर विरोधाशीं त्यांचें पटणार नाहीं.

वैशिष्ट्याच्या बुरख्यांत कांहीं वेळां विचित्रपणा लपवणारीं माणसें असतात. इसापनीतींतील सिंहाचें कातडें वापरणारे प्राणी असेच असतात.

सारी जीवसृष्टि वैशिष्ट्याचा केंद्राभोंवतीं फिरत आहे. मनुष्यानें आपल्या बुद्धिचातुर्यानें त्यांत ढवळाढवळ करून कलमांची प्रथा सुरू केली आहे. पण कलमांचे गुण तरी त्यांच्या घटकांच्या गुणांचा समुच्चयच ! फार तर त्यापैकीं एखाद्या घटकाचें वैशिष्ट्य त्यांत प्रकर्षत्वानें पुढें येईल इतकेंच.

वैशिष्ट्य असेल तरच त्याची नक्कल करण्याचा मोह होतो. वैशिष्ट आहे म्हणूनच वाङ्मयाचा उपमा—संसार चालतो. साधर्म्यानें उपमा संभवते, हें खरें असलें तरी वैशिष्ट्य अगर भिन्नत्वाशिवाय ती देतां येत नाहीं. कमलाची उपमा कमळालाच कोण देणार ?

वैशिष्ट्याच्या आधारावर विश्वाचें रहाटगाडगें चाललें आहे. त्याच होकायंत्रावर आपल्या हालचाली चालू आहेत. वैशिष्ट्य गमावलें तर विश्वाचा तोल सुटेल. वैशिष्ट्य सांभाळण्यांत सृष्टीच्या कार्याला हातभार लावण्याचें पवित्र कार्यच आपण करीत आहोंत.

---

# ७ हा ही हें

‘ कठिण समय येतां आम्हि कामास येतो ’ अशी जाहिरात नें करतांनाहि तें कार्य करणारे असे हे शब्द आहेत ! तुमच्या स्मरण-शक्तीनें तुम्हांस दगा दिला व तुम्हांस आयत्या वेळीं शब्द सुचत नाहीं अशी वेळ आली कीं, हे शब्द वेळ मारून नेण्याच्या कामांत तुम्हांला मदत करतात. ‘ गरजेंतला आसरा तोच मित्र खरा ’ ही कसोटी यांना पूर्णांशानें लागू पडते.

मनुष्य ज्यावेळीं हे शब्द वापरतो, त्यावेळीं पुढील गोष्टी अभिप्रेत असतात. ‘ मी जें बोलतों ( किंवा बोलण्याचा आव आणतों ) तें तुला कळतें ( किंवा तें तुला कळतें, असें मी मानतों ) परंतु मला तें बोलतां येत नाहीं, तरी तुला तें कळूं शकतें.

अव्यक्त परमेश्वर दाखविण्याची कामगिरी मूर्ति करते. त्याप्रमाणें अव्यक्त शब्द दाखविण्याचें कार्य हे शब्द करतात.

एखादें वेळीं बोलणारा योग्य शब्द वापरण्याचा व्यर्थ खटाटोप करतो. ‘ अरे तो हा, अगदीं तोंडाशीं आहे ’ अशा तऱ्हेची मख-लाशी करून ऐकणाराला तो आपल्या अज्ञानांत सामील करून घेतो. दोघेजणहि एकमेकाला ओळखतात पण एकमेकाला सावरतात; कारण त्यावेळीं ते एका माळेचे मणी असतात !

आपल्याला योग्य शब्द सुचत नाहीं अशावेळीं आपण आपलें अज्ञान झांकण्याचा यत्न हें त्रिकूट वापरून करतों. पण अशावेळीं आपलें अज्ञान झाकलें न जातां उलट उघडें पडतें व या शब्दांचा राग येतो व ‘ याच्ञा मोघा वरमधिगुणे नाधमे लब्धकामा ’ या कालिदासोक्तीची आठवण होऊन मुळींच शब्द नाहीं आला तरी परवडलें, पण या क्षुद्रांची मदत घेणें नको असें होऊन जातें. वक्तृ-

त्याच्या वेळीं, साहेबावर वजन मारण्याच्या वेळीं हा अनुभव हटकून येतो.

हा ! या शब्दामुळें एकदम अंगावर शहारे भरतात. नाना फडणविसांना महादजींचीं पत्रें पाहून “ काय नवीन ग्रंथ रचला असेल ” अशी भीति पडे. तसेच या शब्दापुढें काय वाढून ठेवलें आहे, अशी भीति वाटते. याच शब्दानें आनंदातिरेकहि दाखविला जातो. तीन मजल्यांचें ‘ तुरगहास्य ’ हाच शब्द ध्वनित करतो. हलाहल व अमृत एकत्र ठेवणारा सागर कसा असेल तें या दु:ख-सुखांना एकत्र ठेवणाऱ्या शब्दावरून कळतें.

ही म्हणजे सौभाग्यवती. समाजांतील जातपात तोडक लाट येथपर्यंत पोंचली आहे. दर्शक सर्वनाम जात टाकून सामान्य नामांच्या पंक्तीला बसूं पाहत आहे ! ही हा शब्द वापरणारा गृहस्थ संसारांत मुरलेला असला पाहिजे. नाहींतर तो ती या दूरदर्शकाऐवजीं ‘ ही ’ हें अभिधान वापरणार नाहीं. ती म्हणजे लज्जावती नव परिणीता, ही म्हणजे संसारांत मुरलेली जिवलगा !

हें, याला अशा प्रकारचा कांहीं विशेष अर्थ चिकटलेला नाहीं. त्या बाबतींत त्याच्या दोन भावंडांच्या मानानें हा जरा सनातनीच आहे. तीं दोघेजणें बाटगीं आहेत. त्यांनीं आपली जात सोडली, पण याला ती गोष्ट संमत नाहीं. हिंदुत्वनिदर्शक गोपीचंदनाचा टिळा ही स्वारी आपल्या डोक्यावर जन्मापासून मोठ्या अभिमानानें मिरवते. कांहीं आंग्लज्ञ लोक याचा इंग्रजी ‘ हे ’ शीं संबंध आणून वाळलेलें गवत असा अर्थ त्याच्या माथीं मारून, त्याच्या पंगतीचा काटकोन मोडतात, तें त्याला मुळींच आवडत नाहीं. तो म्हणतो, “ नवमतवाद्यांनो ( आग्लज्ञांनो ) माझ्या कपाळावर गंध आहे, तसें त्या युरोपस्थ गृहस्थांच्या आहे कां ? तसें नसेल तर तो माझा धर्मबांधव पण होत नाहीं. त्याच्या कपाळावर

शिक्का देऊन त्याला हिंदुधर्मांत ओढा व मग त्याच्याशीं माझा संबंध जोडा. ते गृहस्थ या गोष्टीला कधींच कबूल होणार नाहींत हें तुम्हां परधार्जिण्या लोकांना कळलें पाहिजे. तेव्हां मी तुम्हाला कायमची सूचना देतों कीं, मी ज्याला मदत करतों अशा माणसाला योग्य शब्द न सुचवतां, त्याची टवाळी करण्याकरितां म्हणून ' हे ' म्हणजे वाळलेलें गवत असा माझा अर्थ केलेला मला खपणार नाहीं. "

ग्रंथ संग्रहालय ... नं. ५२५१

# ८ प्रश्न.

लहान मुलांना तात्यापंतोजी ज्यावेळीं जोडाक्षरें शिकवितात, त्यावेळीं हा शब्द काढणें किती कठीण पडते. प्र मध्यें र संपूर्ण आहे व जोडाक्षरांच्या नियमाप्रमाणें वास्तविक प अर्धा व र संपूर्ण काढला पाहिजे. पण त्या रला एवढी गचांडी मिळाली कीं, प्र—मध्यें त्याचा धड स्वरूपांत मागमूसहि नाहीं. श्न ची पण तीच गत. श नें भलतेंच स्वरूप घेतलेलें. त्यामुळें तो काढण्याकरितां छड्या खावयाची पाळी यावी यांत नवल कसलें ? हा शब्द पाहिल्यावर गुरुजींची वेत्रधारी मूर्ति व खाल्लेला मार यांची स्मृति होते.

प्रश्न जर नसतील तर उत्तरांची अपेक्षाच राहणार नाहीं. पण ते आहेत म्हणूनच त्यांचीं उत्तरें देण्याचा खटाटोप करावा लागतो. परंतु या खटाटोपाच्या पायींच जगांतले सारे शोध लागून मानव-समाजाची इतकी उत्क्रांति झाली आहे. अधिभौतिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक झाडून साऱ्या उन्नतीचें श्रेय परंपरेनें या प्रश्नांकडे जातें. प्रश्न नसते तर मनुष्य रानटी राहता !

प्रश्न आणि प्रश्नार्थक चिन्ह यांची गट्टी आहे. पण ती अभेद्य आहे या कल्पनेवर " बाबराचें चरित्र द्या " या प्रश्नापुढें प्रश्न-चिन्ह करणारे महात्मे आहेत. प्रश्नात्मक प्रश्नापुढेंच हें चिन्ह पाहिजे याची दखलगिरीच त्यांना रहात नाहीं. 'प्रश्नात्मक प्रश्न' ! पिवळ्या पितांबरासारखा हा कांहीं चुकीचा वाक्प्रचार नाहीं.

हेंच प्रश्न—पिशाच्च पालकांना इतकें भंडावतें कीं, नको जीव होऊन जातो. लेकरांची जिज्ञासा पुरी करण्याचा यत्न करणें म्हणजे धापाधापीचा श्रीगणेशा घेणें आहे. मुलांच्या प्रश्नांचीं उत्तरें देणें

म्हणजे आगींत तेल ओतणें आहे. पुष्कळ, आईबापांनीं प्रश्नरूपी अग्नि शांत करण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे चोदावें रत्न असें ठरविलें आहे. आतां, बालमानसशास्त्राचा हा धडधडीत चूक आहे, ही गोष्ट निराळी.

प्रश्न पडला काय अगर उभा राहिला ( उपस्थित झाला ) काय तो सारखाच. वाघाची जात अशी असते. तो उभा असण्यापेक्षां पडण्यानेंच जास्त सामर्थ्यवान होतो. वाघस्वरूपी प्रश्ना, तुझ्याशीं सामना देणें एकंदरींत भयंकरच !

प्रश्नांचें विराट स्वरूप धर्माला पाणी नेतांना अडवून विचारलेल्या ‘ यक्ष प्रश्नांत ’ अगर धर्म—भीष्म प्रश्नांत सांपडतें. मुलाखतींतहि याचा सुकाळ असतो म्हणा !

कांहीं वेळां प्रश्न विचारणारा दिमाख्यांत प्रश्न विचारतो. उत्तर देणाराची त्यावेळीं केवीलवाणी स्थिति असते. परीक्षक व विद्यार्थी ही जोडी अशी आहे. विद्वान् व यशस्वी माणसाला प्रश्न विचारणाऱ्या गरजू इसमाची स्थिति याच्या उलट असते. अवहेलनात्मक आवाजानें आपल्या हुषारीचें प्रदर्शन करीत उत्तर देणारा बोलतो. या चक्रनेमीक्रमाला प्रश्न जबाबदार नसून परिस्थितीच जबाबदार असते.

प्रत्येकापुढें नेहमीं कांहींतरी प्रश्न असतात ‘ देश कसा सुधारेल ? सामाजिक भलत्या रूढी कशा जातील ? ’ असे कांहींच्या पुढें. शिक्षण झालें, आतां ? असा कांहींच्यापुढें. कोणाचे नाजुक प्रश्न. कोणाचे पोटाचे प्रश्न. नुसते सर्व प्रश्न उतरूं म्हटलें तरी—
‘ कज्जलं सिंधु पात्रे । गिरिवर तरु शाखा लेखनी-पत्रमूर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्व काले । तदपि तव गुणानामिश पारं न याती ’ अशी स्थिति होईल. मग माझा काय पाड ?

# ८ प्रश्न.

लहान मुलांना तात्यापंतोजी ज्यावेळीं जोडाक्षरें शिकवितात, त्यावेळीं हा शब्द काढणें किती कठीण पडते. प्र मध्यें र संपूर्ण आहे व जोडाक्षरांच्या नियमाप्रमाणें वास्तविक प अर्धा व र संपूर्ण काढला पाहिजे. पण त्या रला एवढी गचांडी मिळाली कीं, प्र— मध्यें त्याचा धड स्वरूपांत मागमूसहि नाहीं. श्न ची पण तीच गत. श नें भलतेंच स्वरूप घेतलेलें. त्यामुळें तो काढण्याकरितां छड्या खावयाची पाळी यावी यांत नवल कसलें ? हा शब्द पाहिल्यावर गुरुजींची वेत्रधारी मूर्ति व खाल्लेला मार यांची स्मृति होते.

प्रश्न जर नसतील तर उत्तरांची अपेक्षाच राहणार नाहीं. पण ते आहेत म्हणूनच त्यांचीं उत्तरें देण्याचा खटाटोप करावा लागतो. परंतु या खटाटोपाच्या पायींच जगांतले सारे शोध लागून मानव-समाजाची इतकी उत्क्रांति झाली आहे. अधिभौतिक, अध्यात्मिक, वैज्ञानिक झाडून साऱ्या उन्नतीचें श्रेय परंपरेनें या प्रश्नांकडे जातें. प्रश्न नसते तर मनुष्य रानटी राहता !

प्रश्न आणि प्रश्नार्थक चिन्ह यांची गट्टी आहे. पण ती अभेद्य आहे या कल्पनेवर " बाबराचें चरित्र द्या " या प्रश्नापुढें प्रश्न-चिन्ह करणारे महात्मे आहेत. प्रश्नात्मक प्रश्नापुढेंच हें चिन्ह पाहिजे याची दखलगिरीच त्यांना रहात नाहीं. 'प्रश्नात्मक प्रश्न' ! पिवळ्या पितांबरासारखा हा कांहीं चुकीचा वाक्प्रचार नाहीं.

हेंच प्रश्न—पिशाच्च पालकांना इतकें भंडावतें कीं, नको जीव होऊन जातो. लेकरांची जिज्ञासा पुरी करण्याचा यत्न करणें म्हणजे यापाथापीचा श्रीगणेशा घेणें आहे. मुलांच्या प्रश्नांचीं उत्तरें देणें

म्हणजे आगींत तेल ओतणें आहे. पुष्कळ आईबापांनीं प्रश्नरूपी अग्नि शांत करण्याचें उत्कृष्ट साधन म्हणजे [illegible]दावें रट्टा असें ठरविलें आहे. आतां, बालमानसशास्त्राचा हा धडधडीत खून आहे, ही गोष्ट निराळी.

प्रश्न पडला काय अगर उभा राहिला ( उपस्थित झाला ) काय तो सारखाच. वाघाची जात अशी असते. तो उभा असण्यापेक्षां पडण्यानेंच जास्त सामर्थ्यवान होतो. वाघस्वरूपी प्रश्ना, तुझ्याशीं सामना देणें एकंदरींत भयंकरच !

प्रश्नांचें विराट स्वरूप धर्माला पाणी नेतांना अडवून विचारलेल्या ‘ यक्ष प्रश्नांत ’ अगर धर्म—भीष्म प्रश्नांत सांपडतें. मुलाखतींतहि याचा सुकाळ असतो म्हणा !

कांहीं वेळां प्रश्न विचारणारा दिमाख्यांत प्रश्न विचारतो. उत्तर देणाराची त्यावेळीं केवीलवाणी स्थिति असते. परीक्षक व विद्यार्थी ही जोडी अशी आहे. विद्वान् व यशस्वी माणसाला प्रश्न विचारणाऱ्या गरजू इसमाची स्थिति याच्या उलट असते. अवहेलनात्मक आवाजानें आपल्या हुषारीचें प्रदर्शन करीत उत्तर देणारा बोलतो. या चक्रनेमीक्रमाला प्रश्न जबाबदार नसून परिस्थितीच जबाबदार असते.

प्रत्येकापुढें नेहमीं कांहींतरी प्रश्न असतात ‘ देश कसा सुधारेल ? सामाजिक भलत्या रूढी कशा जातील ? ’ असे कांहींच्या पुढें. शिक्षण झालें, आतां ? असा कांहींच्यापुढें. कोणाचे नाजुक प्रश्न. कोणाचे पोटाचे प्रश्न. नुसते सर्व प्रश्न उतरूं म्हटलें तरी——‘ कज्जलं सिंधु पात्रे । गिरिवर तरु शाखा लेखनी-पत्रमूर्वी । लिखति यदि गृहीत्वा शारदा सर्व काले । तदपि तव गुणानामिश पारं न याती ’ अशी स्थिति होईल. मग माझा काय पाड ?

' प्रेश्न ' हा स्त्रियांचा राज्यांतला प्रश्नाचा अपभ्रष्ट अवतार आहे. याचा संबंध ज्योतिषाशीं निगडित आहे. एखादी वस्तु सांडली तर किंवा पुढील कांहीं अंदाज हवा असेल तर, याचा उपयोग करतात. त्याच्या उत्तरांत किती टक्के थापबाजी असते हा प्रश्न निराळा. झुकणाऱ्याला झुकानेवाला झुकविणारच !

यापुढें काय ? असा माझ्याहि पुढें प्रश्न पडत आहे. तरी प्रश्न चिन्हाची सकलशास्त्रप्रेरक, उन्नतिकारक प्रत्येक कार्याला चालना देणारी विघ्नकर्ती वक्रतुंडमूर्ति आपणापुढें ठेऊं काय ? बुद्धिदात्या ऋद्धिसिद्धिनाथा प्रश्नश्चिन्हा तुला दुरून नमस्कार असो. दुर्जनं प्रथमं वंदे. नाहींतर काय करतां हें भूत पाठीशीं लागावयाचें !

# १ सत्य-सृष्टि
## आणि
## कल्पनेचें साहचर्य

कला, आशा, सुधा, निर्मला, अशीं नांवें ऐकून आपणाला कसा कुतूहल-मिश्रित आनंद होतो नाहीं ? या नांवांच्या उच्चाराबरोबर आपल्या डोळ्यासमोर व्यवस्थित कपडे, सुंदर केशरचना व हंसरी मुद्रा असलेली मूर्ति येते. तेंच गोदी, चिमणी, ठकी, धोंडी या नांवाबद्दल कशी एकदम चिळस वाटते, नाहीं ? हीं नांवें आपल्यापुढें पिचके किंवा तिरवे डोळे, घाणेरडे कपडे व गंगायमुनांचा मिलाफ झालेलें ध्यान उभें करतात. सर्पाचें नांव रात्रीं कोणीं घेऊं लागलें तर "आस्तिक आस्तिक" असें म्हटलें जातें. त्याप्रमाणें असलीं नावें ऐकून, 'भीमरुपी महारुद्रा' असें तरुण गुणगुणूं लागतो. हीं नांवें म्हणजे रस्ता बंद असें दाखविणाऱ्या पाट्याच आहेत ! तारुण्यांत तरुण स्त्रियांबद्दल वाटणारा जिव्हाळासुद्धां या नांवांमुळें सुप्त होतो. आधुनिक तरुणांना या नांवांची इतकी दहशत बसून गेली आहे कीं, अशा नांवांच्या मालकिणींची ते चवकशीहि करीत नाहींत, मग चिकित्सा कोठली ? मला वाटतें, झनानखान्यांत गोषामध्यें स्त्रियांना डांबण्यापेक्षा या नांवांचें अवगुंठन त्यांस बहाल केलें असतांसुद्धां तें कार्य होईल. हं, आतां हें मात्र खरें कीं, एखादी कला व आशा एखादे वेळीं काव्यकल्पनांना धक्का देणारी भेटेल. किंवा एखादी धोंडी सुद्धां 'आज जीव वाटे बुडतो सुखसरोवरीं' असें म्हणावयास लावील. सत्यस्वरूप काय असतें ती गोष्ट निराळी, पण पूर्वकल्पनांची आपणांवर अशी जबरदस्त पकड असते कीं, प्रथमच

आपणांवर असा परिणाम होतो. पूर्वग्रह हें तरी काय, कल्पनेच्या साहचर्याचेंच भावंड. नाहीं ?

वास्तविक नांवांत काय आहे ? नांव रुद्राजीबोवा असून तो चाकर असूं शकेल व गण्या धनीसाब असतील. तरीसुद्धां पुस्तकावरील नुसतें नांव अगर चित्र पाहून पुस्तकाबद्दल मत बनविणारे लोक अनेक असतात. सुंदर नांव अगर उठावदार बहिरंग यांच्यामुळें पुस्तकाला भाळलेले लोक आंतील रद्दड मजकुरानें असें खासे फसतात कीं, मग मात्र त्यांना आपल्या समजुतीचें वैय्यर्थ पटते.

जोडे, टोपी, छत्री या वस्तु क्षुल्लक खऱ्या, पण त्यावरून आपण त्या वस्तूंच्या मालकाच्या ठावठिकाणाबद्दल गमतीदार कयास बांधतो. पादत्राणांवरून मनुष्याचें घरांतील आस्तित्व आपण नेहमींच ताडतों. पण याचमुळें कधीं कधीं आपली चांगलीच फसवणूक होते. आमच्या मित्रांच्या चिरंजिवांनीं एकदां त्यांच्या वहाणांची बदली केली. आम्हीं त्यांच्या वहाणा बाहेर नसल्यानें ते घरांत नसावेत असें गृहित धरून त्यांना हाक मारली नाहीं. ते मात्र आम्ही त्यांना हाक मारल्याशिवाय रहाणार नाहीं, या कल्पनेवर वाट पहात बसले व त्यामुळें त्यांना एका गोड प्रसंगाला उपस्थित होता आलें नाहीं. चिरंजिवांचा प्रताप मागाहून कळला.

' आज स्वयंपाक कोणीं केला ? ' असें एका घरांतील मुलांनीं जेवणापूर्वीं विचारलेलें मला आढळलें. ' मी केला ' असें आंतून उत्तर आलें. मुलांनीं खुषींत जेवण उरकलें. मला नंतर असें कळलें कीं, त्या दिवशींचें जेवण तिनें रांधलेलें नव्हतें. मग असें कां ? त्या लहान मेंदूवर याच राक्षसानें केलेल्या प्रभावाचा तो परिणाम होता. वहिनींचा स्वयंपाक चांगला व बहिणीचा वाईट हा त्याचा पक्का समज. मात्र अशा तऱ्हेनें बहिणीचा स्वयंपाक वहिनींच्या नांवावर

खपे ती गोष्ट निराळी. नावडतीचें मीठ अळणी कां व आवडतीचें + + + + मिठ्ठापाणी कां याचा उलगडा मला तेव्हां पडला !

आमच्या ओळखीची एक व्यक्ति फर्स्टक्लास माल म्हणजे इंग्लीश असेंच मानते. उत्कृष्ट जर्मन मालाला, ' तो काय हलका स्वदेशी आहे ? हायक्लास इंग्लीश आहे तो.' असें त्यांना बोलतांना पाहून गंमत वाटते. पण त्यांना प्रज्ञाहत बनविणारा हाच पूर्वग्रह !

तुम्हांला शाळेंत पुष्कळ वेळां आढळेल कीं, दगड्यानें स्वतः केलेलीं उदाहरणें कॉपी ठरते व हुशार मुलाची कॉपी जिरली जाते. दगड मुलाला गांगरवून मास्तर त्याच्या माथीं कॉपी मारतात. अशा तऱ्हेनें प्रामाणिक संन्याशी फांशीं जातो व चोरी करणारा साव सुटतो !

शाळेंतल्या आमच्या आयुष्यांत अशीच गोष्ट घडली. कुळकर्णी नांवाचे एकाच वर्गांत दोन मुलगे होते. एक अबोल पण हुशार. दुसरा लटपट्या पण ताकपिठ्या. गुरुवर्यांची कल्पना कीं, लटपट्या तोच हुषार. त्यांची कल्पना चूक आहे, असें त्यांना ज्यावेळेला कळलें, तेव्हां त्यांनीं त्या अबोल मुलाकडे असें पाहिलें कीं, त्याची हुषारी हा त्याचा अपराधच होता.

'हृदयशारदेंतील' कोंकणी वहाणाप्रमाणें आपलीहि पदोपदीं फसवणूक होत नाहीं कां ? दाराशीं मोटार पोंगावतांच ' हे आले ' म्हणून चट्‌दिशीं उठणाऱ्या उत्कंठिता नाहीं कां दिसतात ? हा परिणाम कल्पनेच्या साहचर्याचाच !

जरा तत्वज्ञान्याच्या भूमिकेंत शिरून विचार केला तर आपणांला असें आढळून येईल कीं, वस्तूंचीं सर्व नांवें यामुळेंच टिकून राहिलीं आहेत. चेंडू व पेटीमधील फरक आपणांला कशानें करतां येतो ? चेंडूला पेटी न म्हणण्याचा अचूक-पणा आपण दाखवतों तो तरी यामुळेंच, नाहीं कां ?

---

# १० आम्रवृक्षाचा कोंडमारा !

त्या गावांत एक वडानें वेढलेला आम्बा आहे. त्या वडानें त्याला इतका वेढला आहे कीं, आंत आम्बा आहे कीं नाहीं हें सुद्धां लक्षांत येत नाहीं. एखाद्या फांदीचें दर्शन इतक्या गर्द विस्तारांतून होईल न होईल ! अनेकांना हें जोंडपें कुतूहलकारक आहे. ते त्याकडे पहा-तात, ' निसर्गाच्या लीलेचें ' कौतुक करतात व निघून जातात. या वडाचें हाच अम्बा चाळीस वर्षांपूर्वीं आश्रयस्थान होता. त्या काळीं त्याच्या मधुर फळांनीं त्यानें लोकांना संतुष्ट केलें होतें ही गोष्ट कोणीच पहात नाहीं ! त्या निर्माल्यवत् आम्राकडे पाहून तुच्छतेनें हंसतात. ते—त्यांचें हास्य पाहून मला अशाच एका संसार—चित्राची आठवण होते.

चाळीस वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं तो एक होतकरू हुषार तरुण होता. त्याकाळीं वाघिणीचें थोडेसें दूध प्यालेल्या अर्धकच्चया सुशिक्षिताला सुद्धां मान होता. त्याला कारकुनी मिळाली. लवकरच एका गरिबाच्याच परंतु सुस्वरूप चुणचुणीत मुलीशीं त्याचें शुभ-मंगल झालें !

त्याचे मित्र त्याची प्रशंसा करीत ' नशीबवान आहेस बेट्या.' बायको नुसतें मोगरीचें फूल मिळवलें आहेस. पण असलें फूल वाप-रतां आलें पाहिजे. नाहीं तर ' कोंबड्या—हातीं रत्न ' !

भोंवतालच्या जगांत तिची इतकी स्तुति व्हावयाची कीं, ' आपण नवऱ्यापेक्षां सरस आहोंत ' असें तिला वाटूं लागलें. तो व ती कोठेंहि एकत्र आलीं कीं, तो तिच्यापुढें फिका दिसावयाचा ! कोणी तसें बोललें तर तिच्या डोळ्यांतून टचकन पाणी यावयाचें ! त्यालाहि हा विसंवाद जाणवावयाचा, पण काय करतो बिचारा !

तिला वाटे आपला नवरा मनावर घेईल तर आपली आजची ' दहा एके दहाची ' परिस्थिति कधींच बदलून जाईल. कुरूप स्त्रियांना दागिन्यांची झूल घालून मिरवतांना तिनें पाहिलें कीं, तिला वाटे ' आपणाला जरी थोडेसे दागिने मिळाले तरी सुद्धा आपण आपण खालीं बघावयास लावूं. नवऱ्याला थोडेसें हिणवलें तर तो जास्त प्रयत्न करील व आपले मनोरथ पुरतील या हेतूनें तिनें घरांत 'भाषेला' सुरवात केली.

आरंभीं त्याचा आवाज चांगला चढे. कांहीं दिवसांनीं दोघांचे आवाज एका पट्टींत येऊं लागले. पुढें तिचा एकटीचाच आवाज कानीं पडे. निंदकांच्या गरूड नजरेंतून हे प्रकार सुटणें शक्य नव्हतें त्यांनीं सुरवातीला तिला चिथवलें. ' त्या मेषपात्राचे बोल उगाच कां ऐकून घेतेस' ते तिला विचारीत. मध्यंतरीं त्यानीं त्याला भर दिली. 'त्या तोंडास तोंड देणाऱ्या कडक-लक्ष्मीला चौदाव्या रत्नाचें पाणी दाखव ' ते सांगत. पुढें ते म्हणत ' मोफॅट आहे बेटा ' !

गांवांतील निंदकांना हें कुचाळकीला चांगलेंच क्षेत्र मिळालें. ' आलाय बलाय सवतीच्या पोरा ! ' विषयांच्या अभावी हें खाद्य तयारच ! त्याला ते प्रलाप सहन होत ना. त्यानें मंडळी टाकली. ' अरे, हाच अरसिक ! अशा चटक चांदणीला माझ्यासारखा नवरा असता तर बोटावर नाचवता. फिरावयाला जाऊन गुलगुल गोष्टी करावयाचें भाग्य लाभण्यासारखें असून या मूर्खाला तें भोगतां येत नाहीं. ' त्यानें शक्तीचे प्रयोग करून त्यांना दबवण्याचा यत्न केला. पण निर्लज्जांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. ते म्हणत ' दाम खोटा नि उगाच आव मोठा ! '

दुर्दैव बिचाऱ्याचें ! त्याला लवकर मूलहि होईना. सबंध सात आठ वर्षें अपत्य–विहीन अवस्थेंत ! त्याला नांवें मिळूं लागलीं. तिला

# १० आम्रवृक्षाचा कोंडमारा !

त्या गावांत एक वडानें वेढलेला आम्बा आहे. त्या वडानें त्याला इतका वेढला आहे कीं, आंत आम्बा आहे कीं नाहीं हें सुद्धां लक्षांत येत नाहीं. एखाद्या फांदीचें दर्शन इतक्या गर्द विस्तारांतून होईल न होईल ! अनेकांना हें जोंडपें कुतूहलकारक आहे. ते त्याकडे पहातात, ' निसर्गाच्या लीलेचें ' कौतुक करतात व निघून जातात. या वडाचें हाच अम्बा चाळीस वर्षांपूर्वीं आश्रयस्थान होता. त्या काळीं त्याच्या मधुर फळांनीं त्यानें लोकांना संतुष्ट केलें होतें ही गोष्ट कोणीच पहात नाहीं ! त्या निर्माल्यवत् आम्राकडे पाहून तुच्छतेनें हंसतात. ते—त्यांचें हास्य पाहून मला अशाच एका संसार—चित्राची आठवण होते.

चाळीस वर्षांपूर्वींची गोष्ट. त्या वेळीं तो एक होतकरू हुषार तरुण होता. त्याकाळीं वाघिणीचें थोडेसें दूध प्यालेल्या अर्धकच्च्या सुशिक्षिताला सुद्धां मान होता. त्याला कारकुनी मिळाली. लवकरच एका गरिबाच्याच परंतु सुस्वरूप चुणचुणीत मुलीशीं त्याचें शुभमंगल झालें !

त्याचे मित्र त्याची प्रशंसा करीत ' नशीबवान आहेस बेट्या.' बायको नुसतें मोगरीचें फूल मिळवलें आहेस. पण असलें फूल वापरतां आलें पाहिजे. नाहीं तर ' कोंबड्या—हातीं रत्न ' !

भोंवतालच्या जगांत तिची इतकी स्तुति व्हावयाची कीं, ' आपण नवऱ्यापेक्षां सरस आहोंत ' असें तिला वाटूं लागलें. तो व ती कोठेंहि एकत्र आलीं कीं, तो तिच्यापुढें फिका दिसावयाचा ! कोणी तसें बोललें तर तिच्या डोळ्यांतून टच्कन पाणी यावयाचें ! त्यालाहि हा विसंवाद जाणवावयाचा, पण काय करतो बिचारा !

तिला वाटे आपला नवरा मनावर घेईल तर आपली आजची ' दहा एके दहाची ' परिस्थिति कधींच बदलून जाईल. कुरूप स्त्रियांना दागिन्यांची झूल घालून मिरवतांना तिनें पाहिलें कीं, तिला वाटे ' आपणांला जरी थोडेसे दागिने मिळाले तरी सुद्धां यांना आपण खालीं बघावयास लावूं. नवऱ्याला थोडेसें हिणवलें तर तो जास्त प्रयत्न करील व आपले मनोरथ पुरतील या हेतूनें तिनें घरांत 'भाषेला' सुरवात केली.

आरंभीं त्याचा आवाज चांगला चढे. कांहीं दिवसांनीं दोघांचे आवाज एका पट्टींत येऊं लागले. पुढें तिचा एकटीचाच आवाज कानीं पडे. निंदकांच्या गरूड नजरेंतून हे प्रकार सुटणें शक्य नव्हतें त्यांनीं सुरवातीला तिला चिथवलें. ' त्या मेषपात्राचे बोलं उगाच कां ऐकून घेतेस' ते तिला विचारीत. मध्यंतरीं त्यानीं त्याला भर दिली. 'त्या तोंडास तोंड देणाऱ्या कडक-लक्ष्मीला चौदाव्या रत्नाचें पाणी दाखव ' ते सांगत. पुढें ते म्हणत ' मोफॅट आहे बेटा ' !

गांवांतील निदकांना हें कुचाळकीला चांगलेंच क्षेत्र मिळालें. ' आलाय बलाय सवतीच्या पोरा ! ' विषयांच्या अभावीं हें खाद्य तयारच ! त्याला ते प्रलाप सहन होत ना. त्यानें मंडळी टाकली. ' अरे, ह्याच अरसिक ! अशा चटक चांदणीला माझ्यासारखा नवरा असता तर बोटावर नाचवता. फिरावयाला जाऊन गुलगुल गोष्टी करावयाचें भाग्य लाभण्यासारखें असून या मूर्खाला तें भोगतां येत नाहीं. ' त्यानें शक्तीचे प्रयोग करून त्यांना दबवण्याचा यत्न केला. पण निर्लज्जांना त्याचें कांहींच वाटलें नाहीं. ते म्हणत ' दाम खोटा नि उगाच आव मोठा ! '

दुर्दैव बिचाऱ्याचें ! त्याला लवकर मूलहि होईना. सबंध सात आठ वर्षे अपत्य–विहीन अवस्थेंत ! त्याला नांवें मिळूं लागलीं. तिला

भलतेच प्रवाद चिकटूं लागले. आधींच यांचा अगदींच वरणभात नि वर निंदेच्या वाशेळ्या तुपाची बरसात !

प्रथम अपत्याच्या वेळचा गहजब ! मूल अमक्यासारखें आहे अशी लोकांनीं डोळे मिचकावीत केलेली कुचेष्टा, त्याच्या हृदयाला घरें पाडी. तिलासुद्धां आपल्या चारित्र्याचे निघत असलेले वाभाडे पाहून भडभडून येई. पण, त्यामुळें तरी तिनें त्याला सहानुभूतीनें वागवावें ना ? पण तिला वाटे, ' यांचाच हा सारा अपराध ' ती ताडताड बोले. दोघांच्या सहनशीलतेचा रबर कमालीचा ताणला गेला व ती निर्लज्ज व तो शेळपट बनला. यापूर्वीं ती कधीं कधीं तरी जरा विचारानें घेई, पण आतां सारेंच पारडें उलटलें. तो तरी काय करील ? जगाच्या निंदाशरांनीं तो जेरीस आलेला त्यांत पत्नीच्या अवहेलनेचा वज्राघात ! मग त्यांच्या अंतःकरणाचा चक्काचूर व्हावा यांत काय विशेष ?

तो खचला, पार खचला ! गांव सोडला, नोकरी सोडली. तीं दोघें नवीन गांवीं आलीं. पण तो त्या गांवाला पूर्ण परिचित झालेला. बातम्या वायुवेगानें पसरतात हेंच खरें. ती कोणा धनिकाच्या आश्र-यास राहिली, रडून कढून बिऱ्हाड मिळविलें. मोल—मजुरी करून पोरांची गुजराण करूं लागली. नवऱ्याला उपाशी ठेऊन त्यानें कामगिरी वर जावें म्हणून तिनें यत्न केला. पण तो आतां माणसांत नव्हताच ! त्याला डोळे नव्हते, कान नव्हते, जीव असावा कारण तो मेला नव्हता !

धनिकाच्या घरीं तो बळजोरीनें कारकुनी करतो. पण एक ओळ काढावयाची असेल तर दहा वेळां दौतींत टाक बुडवून तो हवेंतून रेघ काढील. चमत्कारिक हंसेल व कांहीं तरी पुटपुटेल, भिवया चढ-वील. मांडी घालून स्वारीनें जेठा मारला कीं तासनतास बसते तशी. पत्नी केर काढावयास आली व अंगावर केर उधळूं लागला तरी

उठण्याची बात नाहीं. पत्नीच्या हातून केरसुणीचा प्रहार होईल, तेव्हां स्वारी एक मांडी वर करावयाची. तेवढा केर निघाला कीं दुसरी मांडी वर करावी हा प्रकार ! तांदूळ निवडावे, मुलांना खेळवावें हा त्याचा उद्योग ! त्याचीं मुलें त्याच्याशीं जें वर्तन करतात, त्यावरून त्याचें त्यांच्यांशीं काय नातें असेल....गड्याचें ? विमनस्क तो, त्याला नातें कसलें ?

पत्नीचें वय पन्नास आहे. पण तोंडावरील तजेला तरुणीचा आहे. तो तिच्याकडे पाहतच नाहीं. जग तिच्याकडे पाहून म्हणतें ' पहा कशी मलपत आहे. धनिकाची खरी राणी शोभते ' तिच्या पूर्वचरित्राच्या ऐकींव बातमीवरून तिचा सरळ (!) संबंध त्यानीं धनिकाशीं जोडला होता !

वडानें वेढलेला आंबा ! अलीकडे तुटणार आहे म्हणतात तो. पण त्या गांवचें तें एक विस्मयकारक दृश्य आहे !

---

# ११ संशय पिशाच्च !

त्याला काय कमी होतें ? कर्तव्यदक्ष सुरूप पत्नी, गोजीरवाणीं मुलें, खर्चीपुरती नोकरी. मऽऽग तो उदास कां ? कां ? खरेंच !

तो पहा मित्रांच्या घोळक्यांत आहे. सगळ्याबरोबर गप्पाष्टकांत सामील आहे कां ? " बाबा तुला जगाशीं समरस होणें अशक्य आहे. उगाच गाड्याबरोबर नळ्याची यात्रा कशाला " मन बोलत आहे.

सुंदर चांदणें पडलें आहे. समुद्राच्या लाटा धीरगंभीर गर्जना करीत डौलानें छाती पुढें काढीत येत आहेत. त्यांच्या स्फूर्तीचा भोंपळा फुटून गती खुंटत आहे. तरी त्या खिदळतच आहेत. या देखाव्याचा आनंद सुंदर पांढऱ्या वाळूवर बसून अगर निजून त्याला भोगावासा वाटतो, पण मन म्हणतें, " त्या वाळूंत काच, कांटे, माशांचे नांगे फडेनिवडुंगाचे विषारी दांत असतील. बसलास तर पहा बुवा नसतें लचांड पाठीशीं येईल. " तो भ्रमिष्टासारखा भरम-साट निश्वासत हिंडत आहे !

स्वारी झऱ्याच्या कांठीं उभी आहे. भोंवतीं वनश्री तेजानें न्हाली आहे. झरा गद्गदून हंसत आहे. निसर्गाच्या सान्निध्यांत मनाला शांती मिळेल म्हणून तो येथें आला आहे. तहान लागल्यामुळें झऱ्याचे मधुर शीतल जल तो पिऊन खोट्या ढेकरा देत आहे. पण संशयी मन, त्याला झऱ्याच्या पाण्याच्या स्वच्छतेची शंका येऊन तो विचारक्रांत असा उभा आहे !

नको, एकांत अगदीं असह्य आहे. चार जणांत जावेंसे वाटतें. पण त्यांच्याशीं समरस होतां येत नाहीं !

घरीं मुलाबाळांत आहे. निष्पाप बालकांच्या संगतींत त्यानें रमून जावें ना ? पण अस्वच्छतेच्या भीतीनें मुलांचा मुका घेणें सुद्धां त्याला भयंकर वाटतें, तेथें तो त्यांना जवळ कसे घेणार ?

पत्नीनें केलेला छानदार चहा घेऊन तिच्या रसिकपणाचें कोड-कौतुक करीत तिच्या गालावरील काव्यांत त्याला रंगून जाण्यास काय हरकत आहे ? हरकत ! तिनें चहा केला, त्याच्यासमोर गाळला. उपकरणें चकचकत आहेत. जमिनीवर केराचा लवलेश नाहीं. तिनें दोन वेळां कप विसळला. कपांत पाणी घालून त्याच्या-पुढें ठेवला. त्यानें तो पुन्हां विसळून झाडला, व त्यांत चहा मागि-तला. इतक्यांत कपबशीचा आवाज झाला. झालें, बिनसलें ! तो चहा टाकून चालता झाला. कांचेचा कप फुटला, आणि बारीक कण पोटांत गेला तर ? मृत्यु !

जेवतांना कोणी चुकून पानासमोरून गेलें कीं, त्याचें जेवण संप-लेंच. बरें, त्याच्या साऱ्या लहरी सांभाळून जेवण वाढलें तरी तोंडा-तले घांसच थूंक, पोळीच निवड, भाजींतल्या फोडीच टाक, ताकाची चूळच टाक, असा प्रकार चालावयाचा. त्याच्या पानाभोंवती जो ढीग असावयाचा तो उचलतांना सुद्धा किळस येईल. अतीशय स्वच्छ पदार्थांतून तो कांहींतरी निवडीत असावयाचा. काय तें देव जाणें !

संत्रीं, केळीं, कलिंगड, खारका साऱ्या वस्तू धूवून खावयाच्या. कोणीं हंसल्यास दुकानांतील घाणेरडेपणाचें रसभरित वर्णन करा-वयाचा तो !

विंचू, कोळी, पाल पाहिलीं कीं, तो भ्यावयाचा किती ! वर्त-मान पत्रांत आलेले हलगर्जीपणामुळें या प्राण्यांच्या विषांमुळें झालेले मृत्यू घडाघड सांगावयाचा तो ! एखादे वेळीं बाटली, अगर नळी, अगर कांचेची कोणतीहि वस्तू जवळपास फुटल्याचें त्यानें ऐकलें कीं,

जेवणाला राम राम ! मग घरांतच समोर फुटल्यास बघावयास नको. आंथरूण झाडझाडून निजला तरी त्याला झोंप यावयाची नाहीं. पोटांत भलतेंच कांहीं गेलें तर नाहीं, या संशयांत झोपेंचें खोबरें. पोटांत ढवळूं लागत आहे असें त्यांस वाटावयाचें, व ' कांहींतरी पोटांत खास गेलें आहे, मला तें अगदीं तावडतोब कळतें;' असें तो म्हणावयाचा.

बायकोच्या हातांतल्या कांचेच्या बांगड्या त्यानें काढावयास लावल्या आहेत. तो म्हणतो, ' जा कुठें, सहज पायांत कांच रुपली तर चार सहा महिने ती जखम राहावयाची व कदाचित् कायम अधू करावयाची. '

घरीं कांहीं कार्य आहे, किती तरी माणसें जेवून जात आहेत, पण त्या तीन चार दिवसांत हा कांहीं खाईल तर शपथ ! ' इतक्या रगाड्यांत काय कुठें पोटांत जाईल याचा नेम नाहीं ' मनाचें भूत म्हणतें.

तीन तीन दिवस उपाशी राहतो तो. प्रवासांत तर त्याची दैना. सोडावॉटर सुद्धां........त्या स्फोटक आवाजामुळें....घेणें नाहीं. चहा, अशक्यच !

बोलावयाला लागला तर अशा रावणाच्या बाता मारतो, कीं कोणीही गार व्हावें. आपण भ्रमिष्टासारखें वागतों हें त्याला कळतें, व तसें न व्हावें असा तो यत्न करतो, पण, हें संशयपिशाच्च त्याला सोडील तर ना ?

निबंध-१४
१५८८।२

# १२ पौर्णिमा व अमावस्या

पौर्णिमा ! रजनीचा जरतारी निळा शालू भिरकावून देऊन तिला पांढरें ठिगळलेलें फाटक नेसावयास लावणारी महामाया ! हुकूमशहाचेंच राज्य हें. या ताऱ्यांचें व्यक्तिस्वातंत्र्य हिरावून घेऊन त्यांचें पृथक् तेज दडपून टाकणारा हा कलंकी चंद्र. या लाटसाहेबांच्या राजवटींत त्यांना नामशेष व्हावें लागतें. कोट्यवधि आहेत, ते, खरोखरच प्रतिसूर्य आहेत. तरी या कलंक्याच्या वरचष्म्यांत त्यांनां असें राहण्याची वेळ येते. त्यांच्यांतील अंतर हेंच त्याचें कारण.

रसिक म्हणतात, "काय सुंदर चांदणें पडलें आहे ! आकाशांतून सुधासेकच होत आहे " हं ऽऽ. या हुकूमशाहीच्या वरवंट्याखालीं ताऱ्यांचें तेज भरडून निघून त्याचें हें पीठ गळत आहे, ही अंदरकी बात त्यांना काय माहीत ?

अमावस्या म्हणजे व्यक्तिस्वातंत्र्याचें राज्य ! यावेळीं रजनी कशी प्रसन्न दिसते. तिचा रत्नखचित साज तिला किती उठून दिसतो ! जो तो तारा आपल्या व्यक्तित्वानें निशादेवीला भूषविण्याचा यत्न करतो. तो दक्षिणेकडील नानारंगांनीं चमचमणारा अगस्ति. कृत्तिकांचें मोत्यांचें पेंड, रोहिणीचा कोन, आणि मृगशिर्षाचा चौकडा व त्याच्या पाठीमागील तेजस्वी व्याध. काय ? कसें वाटतें ? तशीच ही तेजानें दुथडी भरून वहाणारी आकाशगंगा. ध्रुवाची वाट दाखविणारे ते उत्तरकडील सप्तर्षि ! आकाशाच्या गडद नीलिम्याच्या पार्श्वभूमीवर कसे खुलतात तारे ? त्यांचें हास्य प्रसन्न नाहीं करीत तुम्हांला ?

हें तारे पाहून, स्वर्गांतील प्राजक्ताच्या फुलांचा सडा तर पडला नसेलना ! अशी कल्पना येते. पण हें सौंदर्य पाहून त्याची वाखाणणी करावी कोणी ? अमावस्या अशुभ असाच आमचा समज. मग या नावडतीची अवहेलना न झाली तरच नवल !

पण, कालक्रमानें येणाऱ्या या दोन निसर्गाच्या राज्यांपैकीं व्यक्तिस्वातंत्र्याचा मंगल काळ कोणता ? अवस कीं पुनव ?

---

# १२ ग्रंथ व मूर्ति

देऊळ म्हटलें कीं त्यांत मूर्ति पाहिजेच. मग ती फत्तरावरील ओबडधोबड मारुतीची असो अगर संगमरवरी पाषाणावरील रेखीव विष्णूची असो. ज्ञानमंदिर--वाचनालय म्हटलें कीं, त्यांत ग्रंथ पाहिजेत. मग भिकारी चोपड्यापासून अमोल ग्रंथराजापर्यंत कोणत्याहि लिखाणाला त्यांत स्थान असो.

कुल्र्याच्या सर्वेश्वर मंदिरासारखा देवळांत अनेक देव एकत्र आणण्याचा प्रयत्न केला गेला आहे. त्याप्रमाणें कांहीं ज्ञानमंदिरांतून ज्ञानाच्या सर्व शाखांचीं पुस्तकें एकत्र आणण्याचा यत्न केलेला असतो. कांहीं देवळें तशींच वाचनालयें, खाजगी अगर सार्वजनिक असतात. 'क्ष' जातीकरितांच अमुक वाचनालय आहे, 'ज्ञ' जातीकरितांच तमुक देऊळ आहे, असा प्रकार दोन्हींकडे आहे. नुसत्या गोष्टींचीच अगर कादंबऱ्यांचींच पुस्तकें कांहीं ठिकाणीं असतात, तर कांहीं ठिकाणीं एका गणपतीचीच अगर शंकराचीच फक्त देवळें आढळतात. प्रत्येक हिंदूंच्या घरीं कोणतेतरी देव तशींच कोणतींतरी पुस्तकेंहि कोनाकोपऱ्यांत पडलेलीं असतात.

छापखान्यांतून देव व पुस्तकें बाहेर पडतात. दिवसें दिवस पुस्तकांचें स्वरूप आकर्षक होत चाललें आहे, त्याप्रमाणें देवांचेंहि. आज आमचे वक्रतुंड लंबोदर महाराज पायीं बुटस्टॉकिंग, हातीं रीस्टवॉच, केस इंग्लिशछाप, अशा अद्यतन थाटांत नववेषभूषालंकृत बाहुलींशीं लडिवाळपणा करतांना दिसतात. त्यांचें पूर्वस्वरूप कसें होतें ! भूर्जपत्रावरील जुने ग्रंथ व आजचे ग्रंथ, यांत जें अंतर तेंच जुन्या व नवीन देवांत आहे.

सिद्धीशिवाय अमूर्त देव साकार स्वरूपांत दिसत नाहीं. प्रतिभेशिवाय खरा ग्रंथ निर्माण होत नाहीं. सिद्धीचा टेंभा मिरवणारे बुवा व प्रतिभेच्या बाता मारणारे लेखक एकाच माळेंतले. त्यांच्या भजनीं लोक लागण्यास थोडी जाहिरात असली म्हणजे बस्स !

आमच्या गणरायांचें पेपरवेट झालेलें पाहून भाविकाला जें वाटेल, तसेंच उत्तम पुस्तकांची रद्दी झालेली पाहून रसिकाला वाटत असेल. पण काय करतात बिचारे, त्यांच्या उपास्यांवर ही दुर्दशा ओढवली आहे खरी !

कांहीं लोक मूर्तींचें शिल्प आणि देवळांचें सौंदर्य व पुरातनत्व पाहण्यास देवळांत जातात. वर्तमानपत्रें व पुस्तकें यांचीं छपाई आणि त्यांचें पुरातनत्व हें पहाणारे वाचक आहेत. देवळांत 'माल' पाहण्याकरिता व ज्ञानमंदिरतां ' गरमागरम ' मजकूर पाहण्याकरितां जाणारे सारखेच. ज्ञानप्राप्ति व अज्ञान निरास या करितां वाचनालयांचे उंबरठे झिजविणारे वाचक व पापनाश व पुण्यप्राप्ति करतां देवळांत जाणारे भक्त, सारखेच भाविक असतात. आपण बडे वाचक आहोंत हें दाखविण्याकरितां वाचणारे व आपण बडे भक्त आहोंत हें दाखविण्याच्या उद्देशानें देवळाभोंवती नाचणारे सारखेच दांभिक असतात.

पुरातन व्यक्तींनीं आचरलेला आचारधर्मच धर्माचें खरें स्वरूप समजून ' एष धर्मः सनातनः' म्हणून जुनें तें सोनें समजणारे सनातनी आहेत. तसेंच पाश्चात्य अगर पौर्वात्य ग्रंथकारांच्या गरमागरम विचारांनांच ' नवयुगधर्म ' असें समजून तसे वागणारे नवमतवादी आहेत. सनातनी देवनिष्ठ, तर हे ग्रंथनिष्ठ. सनातन्यांचीं मतें पुराण व्यक्तींचीं, तर यांचीं मतें एखाद्या पुस्तकाचीं. दोन्हीं सारखेच अंध !

सुंदर इमारती व कपाटें यापायीं ज्ञानमंदिरांत किती पैसा उधळला जातो ? देवळांच्या बांधणीकरितां असेच पैसे नासले जातात ! धूळ खाणारे देव व ग्रंथ कांहीं त्यांतून थोडे नसतात. बिचारा गुरव व लायब्रेरिअन मुशाहिरा मिळतो म्हणून त्यांना कधीं काळीं शिवत असल्यास नकळे !

धर्माचा समाजोन्नतीसाठीं उपयोग आहे, पण असल्या देवळांतून धर्माच्या थोर तत्वांचा काय प्रसार होतो ? सुंदर देवळें म्हणजे धनिकांची एक चैन आहे. असल्या धर्माच्या नामधारी प्रसाराकरितां स्थापन केलेल्या देवळांत सुद्धां किती लोकांना अप्रतिहत संचार आहे ? फक्त चिमूटभर पांढरपेशांना ! मला वाटतें, असलीं ही देवळें बांधण्यापायीं व राखण्यासाठीं जो पैसा उधळला जातो, तोच पैसा धर्मबांधवांना धर्माचीं खरीं तत्वें शिकविण्यांत खर्चे होईल तरच त्या पैशाचें सार्थक होईल.

ज्ञानाचा मानवप्रगतीसाठीं किती उपयोग आहे. पण जेथें समाजाच्या बहुतेक भागांत साक्षरतेचा अभाव, तेथें असल्या ज्ञानमंदिरांत पैसा उधळून काय होणार ? ज्ञानमंदिरांत अगोदर पैसा ओतण्यापूर्वी सर्वांना शिक्षण देणें अवश्य नाहीं कां ?

धर्म अगर ज्ञान यांतील मिरासदार पांढरपेशे. बरींचशीं पुस्तकें पांढरपेशांच्याच गाऱ्हाण्यांचीं, त्यांच्याच जीवनांचीं. इतरांना त्याबद्दल जिव्हाळा कसा वाटावा ?

पुस्तकें ज्ञानवृद्धीकरतां व मूर्ति धर्मवृद्धी करतां असून त्यांची अशी दैना व्हावी कां ?

# संगम

भाग २ रा.

# १ आंबा.

देवदानवांनीं समुद्रमंथन केलें. लबाड देवांनीं दानवांस फसवून अमृताचा कुंभ पळविला. अमृत अतिशय गोड आहे ही गोष्ट कानीं येतांच देवांचे बगलबच्चे मानव, यांनीं तें मिळविण्याकरितां खटपट केली. परंतु देवांना मानवांचें मर्त्यत्व कायम ठेवावयाचें असल्यामुळें व अमृताचें अमरत्व व मानवांचें मर्त्यत्व यांचें विंचूपालीप्रमाणें हाड-वैर असल्यामुळें, त्यांनीं आपल्या भक्तांस विश्वामित्राच्या सृष्टीप्रमाणें एक अमृताची प्रतिकृति देण्याचें ठरविलें. आंबा ही त्या कृतीची पूर्ति होय. सत्यनारायण, सत्यदेव, सत्यव्रत, वगैरे नांवांप्रमाणें याचीही अमृतफळ, आम्रफळ, आंबा, वगैरे नांवें आहेत.

पार्लमेंटांतलि लॉर्ड्स व कॉमन्सप्रमाणें आंब्याचेही ' कलमी ' व ' रायवळ ' असे दोन मुख्य भेद आहेत. पार्लमेंटांतील अगणित पक्षोपपक्षाप्रमाणें याच्याहि असंख्य जाति आहेत. या दृष्टीनें पाहिलें तर आंब्याला पार्लमेंटची उपमा अनाठायीं होणार नाहीं. आंब्याच्या इतिहासांत आल्फान्सो नांवाच्या एका यूरोपीयन गृहस्थानें क्रांति घडवून आणली व आपला एक नवीन पक्ष निर्माण केला. त्यास आल्फान्सो या नांवावरून ' आपूस ' ही संज्ञा पडली. हा पक्ष इतका प्रबळ आहे कीं, माधुर्य, सौंदर्य व राजविलासीपणा या तीन गोष्टींत त्याची कीर्ति अजरामर आहे. पायरीपायरीनें उतरण्याचें ठर-विलें तर ' पायरीला ' आपूसच्या खालोखालचा मान द्यावा लागेल. आपूस ही लघुकथा आहे, तर पायरी ही कविता आहे. आपूस ओजतेजपरिपूर्ण आहे, तर पायरी अलंकारांनीं नटलेली व रसांनीं न्हालेली आहे.

आम्र, कोकीळ व वसंत हा त्रिवेणीसंगम आहे. वसंतऋतूचे दिवस आले आहेत. अरुणोदयाची वेळ झाली आहे. अशा वेळीं फळयुक्त आम्रपल्लवांच्या लमदाटींत कोकीळ पक्षाची ‘ कुहू, कुहू’ म्हणून सनई चालूच असते. असा व्यक्तब्रह्म व नादब्रह्म यांचा हा मिलाफ पाहून हा ब्रह्मघोटाळा तरी काय आहे, हा प्रश्न मनांत उभा रहातो.

अमृताप्रमाणें आंबरसाचाही कधींसुद्धां वीट येत नाहीं. वचंभटांनीं एकदां इतका आंबरस खाल्ला कीं, त्यांच्या कडाकुशीसुद्धां भरून गेल्या. आणखी एका थेंबालाहि जागा मिळणें शक्य नव्हतें. त्यांना अगदीं श्वास लागण्याची पाळी आली. वैद्यबुवा आले. त्यांनीं प्रकृति तपासून मात्रेचे चार वळसे उगाळून दिले. ते त्यांच्याजवळ नेतांच भटजी म्हणाले, ‘ अहो, माझ्या पोटांत इतकें औषध रहाण्यास जागा असेल तर मला त्या ऐवजीं तितका आंबरसच पाजाना ! ’ ह्याचा सारांश असा कीं, हा भटजींचा लोभीपणा नसून आंबरसाचा अवीटपणा होय.

पुष्पांचा गुलाब, पशूंचा सिंह, पक्षांचा गरुड, तद्वत् आंबा हा फळांचा राजा आहे. वर्षाचा आठ महिने राज्यकारभार पाहून भगवान् विष्णु चार महिनें क्षीरसागरावर शयन करतात. हा फळांचा राजा चारच महिन्यांत आपला कारभार आटोपून आठ महिने निसर्गाच्या शेजेवर पडून रहातो.

अमृताच्या अभावास्तव मानवप्राण्याला वाईट वाटण्याचें कारण नाहीं. अमृत इंद्र आहे तर आंबा शंकर आहे. वैभवलोलुप इंद्रापेक्षां दिगंबर शंकरालाच लोक जास्त मान देतात. आंब्याचीही तीच गोष्ट आहे. आंब्याकडे पाहिलें तर मोक्षाकरितां धडपडणाऱ्या मुमुक्षूंची कींव येते. असें वाटतें कीं, मोक्ष मिळविण्यापेक्षां पुनर्जन्म घेणेंच बरें. या निमित्तानें तरी पृथ्वीतलावर येऊन आम्राचा आस्वाद घेतां येईल.

# २ ऑफिस.

‘ ऑफिस ’ या शब्दाची साध्या सुटसुटीत शद्बांत खरीखुरी व्याख्या सांगावयाची ह्मणजे ‘ दयेचा लेश नाहीं, अशी जागा. ’ सुधारलेल्या जगांत सुखासाठीं यंत्रें निर्माण झालीं. यंत्रें माणसानें घडविलीं, परंतु ‘ऑफिस’ नें मनुष्यासच यंत्र बनवून टाकिलें आहे.

ऑफिस, ऑफिसर, साहेब, वगैरे शद्बांचा प्रजेला इतका धाक असतो कीं, त्यांचें नांव निघतांच ग्रामसिंह ( गांवांतील पुढारी ! ) सुद्धां कांपूं लागतात, मग इतरेजनांची काय कथा ?

गुंडोपंत कोठें बाहेर जावयास निघाले कीं लहानगा बाब्या टोपी घालून पुढें उभा. बाहेर न नेल्यास भोंकांड पसरण्याची तयारी. परंतु, ‘ ऑफिसांत जातोंय् मीं. ’ ह्मणून बापानें ठराविक ठशाचें उत्तर दिलें कीं स्वारीचें तोंड बंद ! अगदीं सीलबंद पेटी ! ‘ ऑफिस ’ या शद्बाच्या माथ्यावर गुंडोपंतांनीं बाब्यासच काय, पण राधा काकूंनाही अनेक वेळां फसविलें आहे. ‘ कामाचा ढीग उपसायचा आहे ऑफिसांत; उगीच नाहीं दमड्या मिळत ! ’ असें सांगून स्वारी ऐन रविवारीं सुद्धां ऑफिसच्या नांवावर थिएटरांत बसलेली ! आहे कीं नाहीं कारकुनी डोकें ! !

कॉंग्रेसची स्थिति पाहून ‘ कॉंग्रेस ह्मणजे गांधी व गांधी ह्मणजे कॉंग्रेस ’ असें कधीं कधीं वाटतें. ऑफिस व कारकून यांचा संबंधही असाच आहे.

ऑफिसांतील ‘ मोठा साहेब ’ हा प्रत्यक्ष यमाचा अवतार असतो. लोकांच्या जीविताविषयीं हा बारा महिने तेरा काळ बेदरकार असतो. ‘ हम् करे सो कायदा ’ हें तत्त्व त्याच्या नसानसांत खेळत असतें. अजिबात विचार न करणें व सह्या ठोकणें,

( मारणें नव्हे ! ) हीं दोनच कामें त्याला करावयाचीं असतात. टेबल्, खुर्ची, चिरूट, शृंगारलेली खोली, पट्टेवाले, हेंच त्याचें अफाट ( ! ) विश्व असतें.

' मोठा साहेब ' सोडून दिल्यास ' ऑफिस ' ची पुढीलप्रमाणें वर्गवारी करतां येईल. अव्वल कारकून, नगदी, चिटणिशी, बारनिशी व रेकॉर्ड. या पांच चाकांवर ऑफिसचा रथ बसविलेला असतो. हीं चाकें एकमेकांना टकरा देण्याचें काम दिवसांतून दहा वेळां करीत असतात. त्यांचें कोठें जमत असेल तर तें न जमण्यांतच !

' अव्वल कारकून ' हा सेनापति होय. ' मोठा साहेब ' राजाच्या ऐटींत असतो, तर हा सेनापतीच्या मिजाशीत असतो. इतर नोकरांकडे चावऱ्या कुत्र्याच्या दृष्टीनें पहाणें, हें याचें आद्य कर्तव्य होय. साम, दाम, दंड, भेद, या राजनीतीच्या अंगांत हा वाकबगार असतो. पाया पडल्यास हा पोटाशीं धरील नाहींतर लाथ मारील !

' नगदी ' म्हणजे शुद्ध नग ! हा बारा गांवचें पाणी प्यालेला असेल किंवा नसेल, परंतु बाराजणांजवळून पैसे खाण्यांत मात्र याची शिताफी अवर्णनीय असते. हिशोबांत हटकून तूट पडली नाहीं तर तो नगदी कसला ?

दोन जिभांची पिंवळीं नागीण चावली तर एकाच पिढीचा नाश करते, परंतु चिटणीसाच्या कानावरील दोन जिभांची काळी नागीण चावली तर बेचाळीस कुळ्या नरकांत लोटते. ' मोठा साहेब ' शुद्ध नंदी असतो, परंतु हा मात्र जातीनें कोल्हा असतो. अमृतानें न्हाऊं घालण्याचें किंवा हलाहलाच्या डबक्यांत लोटण्याचें याच्या लेखणींत अद्भुत सामर्थ्य असतें. जपून पाऊल टाकावें लागतें तें याच्या समोरच !

'बारनिशी कारकून ' आणि घाण्याचा बैल यांत फक्त देह-भिन्नतेचाच फरक आहे. हा इतका शहाणा असतो कीं, त्यानें लिहिलेला मजकूर त्यालाच वाचतां येत नाहीं. पोटावारी पगार घेऊन मोटेवेरी काम करणें, हाच त्याचा जन्मसिद्ध हक्क आहे.

रहातां राहिला 'रेकॉर्ड क्लार्क !' रामावतारीं कुंभकर्ण नांवाचा एक कोणसासा 'प्राणी' होऊन गेला. ह्या प्राण्याचा वरदहस्त याच्या डोक्यावर नव्हे डोळ्यावर असतो. रेकॉर्डच्या पिंजऱ्यांत तो जों अकरा वाजतां झोंपतो तो पांच वाजतां जागा होतो. दोन वाजतांचा चहा सुद्धां तो झोंपेंतच घेतो.

ऑफिसच्या चिमुकल्या विश्वाची अंतर्गत रहाटी अशी असते.

एकाद्यानें एखाद्या गोष्टीची दाद मागण्याकरितां आपल्या बारशाच्या दिवशींच स्वदस्तुरनें एकाद्या ऑफिसांत अर्ज केला, तर त्याचा निकाल त्याच्या बाराव्याला तरी लागेल कीं नाहीं, याची शंकाच आहे.

दरोडेखोर दुष्ट तर खरेच, पण लुबाडतांना ते श्रीमंतांची तरी मान धरीत असतील, परंतु 'ऑफिस' या भपकेबाज नांवाखालीं दिवसाढवळ्या वावरणारे हे हरामखोर गरीबांच्या मानाहि नाहक मुरगाळण्यास कमी करीत नाहींत. यांना मात्र कोणी दोष देत नाहीं. 'दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिये' हेंच खरें !

# ३ चुंबन

कांहीं अवाढव्य गोष्टी क्षुल्लक घटनेमुळें घडून येतात. ‘ गोष्टींतल्या ’ एका राजाच्या राज्याचा नाश होण्याचें कारण, त्याच्या सेनापतीच्या घोड्याच्या पायांतील नालाचा खिळा पडून गेला होता. घटना क्षुल्लक, पण क्रांति किती विलक्षण !

चुंबनाचीही तीच गत आहे. एका तत्त्वज्ञानें सांगितलेंच आहे कीं, ‘ Creation bigan with a kiss ’ मानव, पशू, पक्षी, वगैरे जीवसृष्टीचा जगाच्या पाठीवरील वाढता पसारा, वाढण्यास चुंबनापासून सुरवात झाली आहे.

मानवांप्रमाणें पशूपक्षांनाहीं चुंबनाची भावना आहे. ओंठाला किंवा गालाला ओठ लावून मनुष्य चुंबन घेतो, जिभेनें देह चाटून पशू चुंबन घेतात, तर चोंचींत चोंच घालून पक्षी चुंबनाची सार्थकता करतात.

लहान मुलांच्या चुंबनास ‘ पापा ’ ही संज्ञा दिली जाते. तेव्हां ‘ पापा किंवा मुका ’ आणि ‘ चुंबन ’ यांत सार्थ नसला तरी भावनेचा फरक आहे, ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. मनुष्याची ‘ पापा ’ घेतांना जी मनस्थिति असते, ती ‘चुंबन’ घेतांना असतेच असें सांगता येणार नाहीं. किंबहुना तीं तशी नसते, असें म्हणणेंच सयुक्तिक दिसेल.

वास्तविक पहातां चुंबन ही अतिशय सात्त्विक गोष्ट आहे. परंतु त्याची स्थिति देवळांतल्या देवाप्रमाणें झाली आहे. देऊळ आहे, आंत देव आहे; मानव येतो, मूर्तीवर फूल टाकतो; निघून जातो. हृदयांत भक्तीची तळमळ लेशमात्र नसते. तद्वतच चुंबन. चुंबन-

योग्य वस्तु आहे, परिस्थितीहि बरी आहे; स्त्रीपुरुष पुढें येतात, चुंबन घेतात; दूर निघून जातात. प्रेमाच्या ओलाव्याचा अंश असेल तर शपथ. मग त्याची स्थिति कुंकू लावणाऱ्या विधवेप्रमाणें कां होणार नाहीं ?

चुंबनांत दोन आत्म्यांचें ऐक्य करण्याची शक्ति आहे. चुंबक चुंबनाबरोबर दुसऱ्याचें हृदय जणूं काय ओढून आपल्या हृदयांत सांठवीत असतो. आणि अशा रीतीनें दोन हृदयांचा मिलाफ होतो. देहानें भिन्न असूनसुद्धां चुंबनाच्या बिजागरानें आत्म्याचें एकीकरण करतां येतें.

ओंठाला ओंठ लावणें म्हणजे चुंबन, व गालाला ओंठ लावणें म्हणजेही चुंबनच. परंतु सूक्ष्म दृष्टीनें पाहिल्यास त्यांतही फरक आहे हें कळून येईल. ओंठाला ओंठ भिडवून चुंबन घेण्यास दोनही जीवांची ( मनोमन ) सम्मति लागते. गालाला ओंठ लावून चुंबन घेण्यास एकाच जिवाच्या खुषीची सक्ति पुरेशी पडते.

चुंबनाकरितां पुष्कळ लोकांनीं भगीरथ प्रयत्न केले आहेत. चुंबनाकरितां राजवाडा सोडून दुष्यंत पर्णकुटींतील पाहुणचार घेत राहिला; ययाति म्हाताऱ्याचा तरूण झाला.

चुंबनांत ' पहिल्या चुंबनाला ' विशेष महत्व आहे. ' पहिल्या चुंबनांत ' माधुरी अवर्णनीय यांत मात्र शंका नाहीं. अरेरे ! ' पाहिलें चुंबन ' एकदां घेतलें कीं फिरून घेतां येत नाहीं, ही किती दुःखद गोष्ट आहे ? त्यापेक्षां सर्वसंगपरित्याग करून तें ' पाहिलें चुंबन ' आयुष्याच्या इतिश्रीपर्यंत करीत रहावें असें वाटतें. याच करितां ' गोविंदाग्रज ' सांगतात—' निशिदिनीं । नित्य जन्मुनी । वाटतें मनीं । मरण सोसावें । परि 'पहिलें' चुंबन घ्यावें ।—'

# ४ बिजवर.

समान हक्काकरितां जिवाचें रान करणाऱ्या भगिनींवर्गा, ' बिजवर ' हा शब्द तुला शब्दकोशांत मिळूं शकेल, परंतु ' बिज-वधू —' छट ! नांव कशाला ? नाहींतर दुसरे शब्द पहा. पुल्लिंगाला स्त्रीलिंग ठरलेलें ! नवरा, विधूर, कुमार, यांना नवरी, विधवा, कुमारी, वगैरे शब्द लागलेच फेकतां येतात. परंतु ' बिजवर ' शब्दास असा समान हक्काचा शब्द देऊं शकाल काय ? नाहीं ! नाहीं ! ! नाहीं ! ! ! स्त्रीहक्कांची पायमल्ली करण्यांत पुरुषांनीं जे हजारो मार्ग स्वीकारले आहेत, त्यांत ' बिजवरानें ' त्यांस अमोल साह्य केलें आहे.

सह्याद्रींतील वाघरें हिमालयांतील किंवा सातपुड्यांतील वाघापेक्षां निराळीं असतील, परंतु ' बिजवर ' वर्गीय प्राणी मात्र कोणत्याही जागीं सारखाच दिसून येतो. ' बिजवर ' हा शब्द ऐकला कीं, दीनवाणी, अर्धांगविगलित, स्त्री वाक्शरांनीं जर्जर झालेली, लुळी, पांगळी, डोळ्यांत प्राण आलेली, मागील अंकावरून पुढें चालणारी, अशी एक बावळट मूर्ति डोळ्यासमोर उभी रहाते.

बिजवराला जीं अनेक कर्तव्यें करावीं लागतात, त्यांतील पहिलें म्हणजे नूतन परिणित वधूच्या लाथा झेलणें व सावत्र ( ! ) मुलांस ( अर्थात् नूतन पत्नीचीं सावत्र मुलें. बिजवरास तीं ' सावत्र ' वाटूं लागतात, हा भाग निराळा ! ) लाथा देणें. हीं दोन्हीं कामें तो मोटेच्या बैलाप्रमाणें करीत असतो. सर्व जगास ' त्राहि भगवान् ' करून सोडणारा रावण मंदोदरीपुढें गरीब गाय बनत असे, असें म्हण-तात. बिजवराचें जरी या बाबतींत रावणाशीं साधर्म्य असलें तरी

त्याची ‘ बिजवधू ’ मंदोदरी मात्र खास नसते. तिची गणना त्राटिकेच्या वर्गातच करावी लागेल.

मनुष्य ‘ बिजवर ’ झाला कीं, त्याला एक व्यसन लागतें. त्यास ‘ बिजवरी व्यसन ’ असें नांव दिल्यास सार्थ दिसेल. तें व्यसन म्हणजे नूतन पत्नीच्या स्वभावांत अजिबात खोड न काढतां तिच्या प्रत्येक कार्याची तरफदारी करणें हें होय. लवंग खातांच पोटांत उष्णता वाढणारा व वेलची खातांच सर्दीचा रोग बळावणारा एकादा अतिशय नाजूक प्रथमवर बिजवर झाला, तर त्याचा नाजूकपणा लयास जाऊन तो स्वावलंबी बनतो. स्वतःचे कपडे धुणें, मुलांस अंघोळी घालणें, पत्नीस स्वैंपाकाच्या वगैरे कामांत हरप्रकारें मदत करणें, वगैरे गोष्टी त्याच्या जीवनांत नित्याच्या होतात. प्रथम पत्नीच्या अत्युत्तम स्वैंपाकांत सुद्धां नानाप्रकारच्या खोड्या काढणारा खंदा प्रथमवर ‘ बिजवर ’ होतांच त्याला अळणी अन्न मधुर लागतें आणि तिखट चमचमीत लागतें.

‘ एकच प्याल्यांतील ’ ‘ सिंधू ’ बिजवराची पत्नी असती तर ‘ सुधाकराची ’ तिचा छळ करण्याची काय छाती होती ? ‘ तळीराम ’ सारख्या अशक्त अवलादीनें ‘ गीतेला ’ दटावलें, तें त्याच्या जवळ प्रथम वराचें ‘ क्वालिफिकेशन ’ होतें म्हणूनच. नाहींतर ‘ गीतेनें ’ त्याला केव्हांच ‘ दे माय धरणी ठाय ’ करून सोडलें असतें.

बिजवराला नूतन पत्नीस घेऊन फिरण्यास जाण्याची फार आवड असते; परंतु या इच्छेस त्याच्या पत्नीकडूनच नेहमीं मोडता येतो. यामुळें त्याचा नाइलाज होतो व तो मूग गिळून स्वस्थ बसतो. मूग गिळून स्वस्थ बसण्याची कला त्यास निसर्गसाध्य वाटते.

कधीं कधीं बिजवर आपल्या ‘ बिजवधूस ’ चारचौघां देखत दटावण्याचा प्रयत्न करतो. परंतु तो अरण्यरुदनवत् होतो आणि

हा केवळ नाटकी आभास आहे, ही गोष्ट त्या प्रेक्षकांस चांगलीच कळून येते.

प्रथमपत्नीची लहानगीं मुलें आणि द्वितीय भार्या यांच्या सान्निध्यांत बिजवराची इकडे कडा व तिकडे दरी अशी स्थिति असते. या नवीन महामायेकडून मुलांस त्रास होऊं नये, असें त्यास मनापासून वाटतें, परंतु तसा त्रास होतो याबद्दल त्याला कांहींच करतां येत नाहीं.

' बिजवर ' हा एक ' संप्रदाय ' आहे. संप्रदाय हे विवक्षित विचारांचा, आचारांचा व उपास्यांचा इतरांत प्रसार करतात. आपण जें मानतों तें मानणारा व जें मानीत नाहीं तें न मानणारा, अशी ज्याची वृत्ति बनली असेल, त्याला संप्रदायांत घ्यावयाचें, अशी त्यांची वृत्ति असते. आणि नूतन पत्नी हें त्यांचें उपास्य असून तिच्यावर विचार करणें व तिच्या आज्ञेप्रमाणें आचरण करणें हेंच त्यांचें इहलोकींचें कर्तव्य असतें.

---

# ५ ‘ मोटरड्रायव्हर ! ’

५२५१

अधिभौतिक शास्त्रांचा अभ्यास करून निर्जीव यंत्रें निर्माण करण्याचे माणसानें कारखाने काढले आहेत. यंत्रांचें नियंत्रण करण्याकरितां ईश्वरानेंहि कांहीं सजीव जाति निर्माण केल्या आहेत. इंजिनीअर, फिटर, + + + ड्रायव्हर, + + + मास्टर, इत्यादि. सध्या अन्यांशीं कर्तव्य नसून ‘ मोटरड्रायव्हर ’ या जातीबद्दल विचार करावयाचा आहे.

‘ मोटरड्रायव्हर ’ या जातीच्या एकाद्या घटकाकडे पाहिलें म्हणजे ही जात देवनिर्मित नसून दैत्यप्रसव आहे, असें वाटूं लागतें. दुष्टपणा, व्यसनबाजी, एककल्लीपणा, दुराग्रह, छाकटेपणा, या कटु पंचरसांचा गाळीव अर्क काढून तो या ड्रायव्हररूपी दगडी मूर्तीच्या नसानसांत ओतला आहे कीं काय, असा भास होतो.

धर्महीन, जातिहीन, संस्कृतिहीन, सद्गुणाचा लेश नसलेला, दयेच्या थेंबाचा अभाव असलेला, माणुसकीला मोताद झालेला, असा हा मानवरूपधारी पशु पाहिला, म्हणजे जग दोन पाउलें मागें राहिलें तरी चालेल, परंतु दळणवळणाकरितां ही यांत्रिक सुधारणा नको, असें वाटणें साहजिक आहे.

हिंदु, मुसलमान, पारशी, ख्रिश्चन, शाकाहारी, मांसाहारी—कोण-त्याही पंथाचा : मनुष्य असो,—तो मोटरड्रायव्हर झाला कीं त्याला जात एकच ! ‘ मोटरड्रायव्हर ’ हेंच तिचें नांव !

जीवनाकरितां हे ही कला शिकून घेतात, परंतु मूळ नक्षत्रावर जन्मलेलें मूल ज्याप्रमाणें आपल्या कुळाचा समूळ नाश करतें,

त्याप्रमाणें ही कलाहि त्यांच्या अमूल्य जीविताचा ऱ्हास करण्यास कारणीभूत होते.

सकाळीं डोळे चोळीत उठावयाचें; प्रातर्विधि लहर लागेल तर आटोपावयाचा; क्लीनरच्या नांवें दोन शिव्या हांसडून कुरकूर करावयाची; कोणत्यातरी हॉटेलांत ‘ सिंगल् ओकून ‘ पट्टी , खाऊन सिगारेट शिलगावयाची; उतारूंची शक्य तितकी गैरसोय करून शिव्याशापांचे आशीर्वाद ग्रहण करीत मोटर हाकावयाची; जेथें जेथें हॉटेल लागेल तेथें तेथें चहा, चिवडा, पान, विडी यांच्या आवृत्त्या करावयाच्या; मुक्कामावर गेल्यावर एक-दोन ग्लास झोकावयाचे; जेवण आहे तर आहे, नाहीं तर नाहीं; — छी ! छी ! कसलें हें जीवन ? बिचाऱ्याच्या तोंडावर कधीं उत्साह आहे कीं आनंदाचा लेश आहे— किंवा एखाद्या कपिलाषष्ठीच्या मुहूर्तावर तरी तो शुद्धींत आहे—नकोरे बुवा ! ती गोष्ट सुद्धां बोलण्यांत अर्थ नाहीं ! !

हिंदुधर्माचीं तत्त्वें उदात्त— त्याचा आश्रय करून हजारों लोकांची वृत्ति ‘ वसुधैव कुटुंबकम् ’ अशी झाली आहे, म्हणून हिंदु लोक अभिमानानें उड्या मारतात; परंतु धर्मसंस्कृतीचें गांठोडें गुंडाळून ठेवून सुद्धां ‘ड्रायव्हरची’ वृत्तिहि त्यांच्याप्रमाणेंच झाली आहे. फरक इतकाच कीं, पहिले क्षणोक्षणीं जगताच्या कल्याणासाठीं जिवापाड काळजी घेत असतात; दुसरे मात्र या अवाढव्य कुटुंबाविषयीं बेदरकार असतात. रक्ताचा प्रत्येक बिंदु जनतेच्या रक्षणाकरितां लावणें, हें पहिल्याचें ध्येय; तर दुसरे त्यांच्या ताब्यांत ( मोटारींत ) जे जीव येतात त्यांच्या रक्ताच्या बिंदुविषयींच काय परंतु देहाविषयींहि उदासीन असतात. एकाच ईश्वराचीं हीं लेंकरें, पण यांतील स्वभावभेद पाहून कद्रु आणि विनता यांच्याप्रमाणें यांच्या माताही सवती असाव्या, असा संशय येतो.

# ६ स्त्री !

## यत्र नार्यस्तु पूज्यंते रमन्ते तत्र देवताः

स्त्री ही पुरुषाची जीवनशक्ति आहे. सहनशीलता, सहानुभूति आणि सौजन्य यांचें एकमेव मिश्रण स्त्रीस्वभावांत दिसून येतें. प्रजोत्पादनाचें अवघड कार्य अंगावर घेऊन ईश्वराच्या सृष्टीचा विकास करण्याचें दिव्य कंकण स्त्रियांनीं आपल्या हातांत बांधलें आहे. अक्कल 'चुलीपुरती' म्हणून जे स्त्रियांची हेंटाळणी करतात त्यांची कींव येते. चूल आणि मूल यांचा प्रतिपाळ करण्याकरितां तानाजीची तरवार आणि नानाफडणविसाचें डोकें या दोन गोष्टींची गरज लागते. धर्म, संस्कृति आणि देशाभिमान यांचें पोषण करण्याचें, टिकविण्याचें आणि लोकांच्या गळीं उतरविण्याचें खडतर काम आजपर्यंत स्त्रियाच करीत आल्या आहेत. स्त्री नसती तर पुरुषाचें जीवन सहारा वाळवंटाप्रमाणें ओसाड झालें असतें. स्त्रीच्या हृदयांत प्रेमाचा झरा वहात आहे, जिभेवर विधिवाचा नाचत आहे आणि हातांत वज्राची शक्ति वास करीत आहे. 'जिच्या हातीं पाळण्याची दोरी तीच देशातें उद्धारी.' स्त्री जीवनांतील मुख्य ध्येयावर ज्यानें ही म्हण रचिली, त्यानेंच आपलें मातृऋण फेडलें आहे. 'मुलगी झाली' तर जे आईबाप नाकें मुरडतात, त्यांच्या स्वार्थीपणाचा राग धरावा कीं मूर्खपणाची कींव करावी हेंच कळत नाहीं. माता, पत्नी व भगिनी, या दया, प्रेम व भावना या त्रयींच्या मूर्तिमंत पुतळ्या आहेत. शाळेच्या कोंडवाड्यांत दिवस घालवून घरीं आल्यानंतर आईचें दर्शन होतांच बालक नाचूं बागडूं लागतें; शिक्षणाच्या किंवा नोकरीधंद्याच्या कैचींत सांपडलेला अविवाहित घरीं येतांच बरोबरीच्या बहिणीच्या दर्शनानें समाधान पावतो आणि जगाच्या बाजारांत गुरफट-

लेला विवाहित घरांत पाऊल टाकतांना दारांत उभ्या राहिलेल्या पत्नीचें मुखावलोकन करून वेडावून जातो. या तीन जिवांचा श्रमपरिहार करण्याचें किंवा त्यांना दुसऱ्या दिवशीं कर्तव्यास जागृत करण्याचें काम प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रीतीनें स्त्रियाच करीत आल्या आहेत. पुरुषांच्या रुक्ष आयुष्यांत ज्या ज्या गुणांचा अभाव आहे, ते ते गुण स्त्रीच्या अंगीं घालून ' स्त्रीपुरुष ' या द्वंद्व समासाची ईश्वरानें पूर्तता केली आहे. ' अर्धनारीनटेश्वर ' शंकराला ईश्वरपदाचा मान मिळतो तो या करितांच. कारण त्याचें ठिकाणीं ' स्त्रीपुरुष ' या द्वंद्व समासाचें अधिष्ठान आहे. स्त्रीची मदत देऊन पुरुषाचें जीवन रम्य, पवित्र, सुंदर आणि भावनामय केल्याबद्दल पुरुष त्या देवाधिदेवांचा निरंतर ऋणी राहील.

# ७ ‘ इश्य ’

नदीचें मूळ किंवा ऋषीचें कूळ शोधूं नये, असें म्हणतात. त्याच प्रमाणें ‘इश्य’ची उत्पत्तीही न शोधणेंच बरें. ‘इश्य’ या शब्दांत माधुरी, आकर्षण व जादू आहे, ही गोष्ट मात्र काव्याचा प्राथमिक शाळेंतील त्रिगारींत दाखल झालेल्या लाजाळू विद्यार्थ्यापासून तों काव्यपारंगत प्रौढ कवीपर्यंत कोणीहि कबूल करील.

‘राम’ नामानें मनुष्य भवसागर तरून जातो, परंतु ‘इश्य’ या शब्दाबरोबर तो भवसागरावर तरंगत रहातो. ‘इश्य’ या शब्दाची जवळ जवळ रामनामाइतकी महति आहे.

‘इश्य’ या शब्दाचें जर विहंगमावलोकन केलें, तर असें दिसून येईल कीं, पहिल्यानें तो तिरस्कार किंवा निषेध या अर्थानें प्रचारांत आला असावा. कुंभारकिड्याला पंख फुटून तो ‘कीटक’ या सदरांतून निघून ‘पक्षी’ या सदरांत जातो; तद्वतच हळू हळू या ‘इश्य’चेंहि ‘निषेधांतून ‘आश्चर्यांत’ रूपांतर झालें असावें. हल्लीं मात्र त्याचा तिरस्कार, आश्चर्य, प्रेम वगैरे निरनिराळ्या भावना दर्शविण्याकडे सररास उपयोग होतो.

स्त्रियांच्या ओंठावरील लालीप्रमाणें ‘इश्य’ ही त्यांच्या ओंठावर ठेविलेलें असतें. यामुळेंच त्याची योग्यता समर्थांच्या घरच्या श्वानाप्रमाणें झाली आहे. स्त्रियांच्या मुखांतून बाहेर पडण्याऐवजीं ‘ इश्य ’ जर पुरुषांच्या मुखांतून बाहेर पडेल, तर त्याची स्थिति स्मशानांतील हाडें चघळीत बसलेल्या कुत्र्याप्रमाणेंच होईल. त्याला कोणीहि महत्व देणार नाहीं. ज्या अनेक गोष्टी स्त्रिया ‘ आपल्या ’ म्हणून जवळ करतात, त्यांत ‘इश्य’ या वस्तूस अग्रस्थान द्यावें लागेल.

' अगबाई ' हें ' इश्यचें ' लहान भावंड आहे. म्हणूनच त्याची ' इश्य ' पुढें मिजास चालत नसावी. हें पाठीला पाठ लावून आलेलें भावंड मात्र त्याच्या पावलावर पाऊल टाकण्यांत दंग असतें.

' इश्य ' किंवा ' अगबाई ' हे शद्ब कोठूनही ऐकूं आले, तरी मनुष्य—मनाचे कान व जिवाचें भान करून तिकडे लक्ष देऊं लागतो-हें जगांतील दहावें आश्चर्य नाहीं काय ?

---

# ८ स्मशान.

‘ स्मशानां’त आनंद, पावित्र्य व शांतता यांचें एक समयावच्छेदें-करून ऐक्य दिसून येतें.

स्मशानभूमि व देऊळ ह्या दोघांत वास्तविक पाहतां भिन्नता नाहीं. देवळांत परमात्म्याचें आस्तित्व असतें, असें म्हणतात. स्मशानभूमीवर ( मृत ) आत्मे वावरत असतात, यांत मात्र संदेह नाहीं.

कवि, लेखक, यांची काव्यभूमि; वेडे, भ्रमिष्ट, यांची आनंदभूमि; तडी, तापसी, यांची तपोभूमि; महार, मांग, यांची जीवनभूमि; मृतात्म्यांची त्यागभूमि; भुताखेतांची क्रीडाभूमि; आणि ‘ कपाळ-मालाधर ’ शंकराची निवासभूमि म्हणून स्मशानभूमीला सर्वांगीण महत्व प्राप्त झालें आहे. देव, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, अंत्यज व राक्षस हे सर्व एका दिलानें, खेळीमेळीनें आणि उत्साहानें स्मशा-नभूमीवर आपापलीं तट्टें हांकीत असतात.

गांवाच्या बाहेर, टेंकडीच्या पायथ्याशीं, ओढ्याजवळ, झाडांच्या राईंत, मोकळ्या मैदानांत स्मशानभूमि वास करते, परंतु गांवांतील हरएक जीवसृष्टीवर ती आपली हुकमत चालवीत असते.

नानातऱ्हेचे भोग भोगणें हें जीवसृष्टीचें ध्येय असतें. त्याग हा स्मशानभूमीचा अंतिम हेतु आहे. न कंटाळतां, न भितां, न कुर-कुरतां, आल्हादानें, निःशंकपणानें व बाणेदार वृत्तीनें मृतात्म्यांस मांडीवर आश्रय देण्याचें कार्य स्मशानभूमि करीत आली आहे. आई काय, बाळास फार तर बाल्यावस्थेंत कटि—खांद्यावर खेळवील किंवा थोपटील, परंतु स्मशाभूमीनें ज्यास ‘ आपला ’ म्हटलें, त्याला ती निरंतर लहान बालकाप्रमाणें वागविते. रक्ताच्या आईपेक्षां स्मशानभूमीच जास्त प्रेमळ व उदार आहे.

असें असतां, बेअकली, नादान मानववर्ग स्मशानभूमीचा विनाकारण तिरस्कार करतो. कृतघ्नपणा मानवप्राण्याच्या पांचविलाच पुजलेला आहे. ' स्मशान ' शब्दाचा त्यानें निष्कारण ' बागुलबोवा ' करून ठेविला आहे. कावळ्याच्या शापानें गाय मरत नसते, हें त्यानें लक्षांत ठेवावें.

स्मशानांत एकप्रकारचें दिव्य संगीत नेहमींच ऐकूं येतें. निसर्गनियमानुसार आत्माहुतीस तयार असलेल्या जळत्या जीवांच्या पोळल्या आशांची ती कोमल कोलाहल असतां अडाणी जनांस ती पेटत्या देहाच्या कराल कुरकुरीप्रमाणें वाटते, यांत आश्चर्याची गोष्ट नाहीं.

स्मशानभूमीरूपांत वावरणाऱ्या साध्वी ललने, ये-ये; तूं जर निघून जाशील तर जगज्जनार्दनाच्या मूर्तीवरील निर्माल्य कोण काढणार आणि त्यास नवोत्फुल्ल कुसुमांनीं सजविण्यास कोण अवसर देणार ?

# १ डोळा

नं. ... ता. ...

डोळा हा इतका सामान्य शब्द आहे कीं, कोणीहि त्या शब्दावर चिकित्सक बुद्धीनें विचार करीत नसेल, परंतु थोडासा विचार करतांच ही वस्तु व तिची कृति किती विलक्षण आहे हें लक्षांत येईल. अफाट विश्वाला आपल्यांत अंतर्भूत करून घेण्याची ताकद इश्वरानें या वस्तूस दिली आहे. डोळा हा ' हिंदू ' आहे. याचा अर्थ असा कीं हिंदूप्रमाणें याच्याहि जाति आहेत. काळेभोर, निळे, घारे, पिंगट, लाल, वगैरे त्यांतील प्रमुख जाति होत. यांतहि पोटजाति आहेतच. तिरवा, काणा, वगैरे. डोळ्यांचें आस्तित्व व नास्तित्व यांचें प्रमाण पुढील प्रमाणें आहे. डोळ्यांचें आस्तित्व:—शेंकडा शंभर टक्के सुख. डोळ्यांचें नास्तित्व शेंकडा दोनशें टक्के दुःख !

कोणत्याहि मनुष्याच्या स्वभावाचें उत्तमपणें दिग्दर्शन करणारी वस्तु म्हणजे डोळा. गंभीर, क्रूर, बावळट, राकट, छाकट वगैरे प्राणी त्यांच्या डोळ्याकडे पहातांच चटकन् ओळखतां येतात. काव्यसृष्टींत काळेभोर डोळे विशेष पसंत केले जातात. काळेभोर डोळे उदात्त स्वभावाचें चिन्ह समजलें जातें; निळ्या डोळ्यांचा प्राणी अल्लड किंवा खेळकर स्वभाव व्यक्त करतो; घारे डोळेवाला लबाड असतो; पिंगट किंवा लाल डोळ्यांचा प्राणी हलकट व क्रूर या सदरांत पडतो. तिरवा किंवा काणा धूर्त स्वभाव दाखवीत असले तरी दुसऱ्याची सर पहिल्यास येणार नाहीं. पाणीदार टपोरे डोळे जातिवंत सौंदर्याचें लक्षण आहे. चिंचोळे व खोल डोळे असलेला प्राणी व कोल्हा यांत फारसा फरक नाहीं.

' डोळा ' हा शब्द भाषेचे वाक्प्रचार वाढविण्याच्या कामींही पराङ्मुख झाला नाहीं. ' डोळा लागणें ' हे शब्द उच्चारतांच झोप

लागल्याचा भास होतो. ' डोळे येणें ' ही मात्र अजब गोष्ट आहे. जेव्हां डॉक्टरसाहेब ' डोळे आले आहेत ' असें सांतात, तेव्हां ' ते गेले होते कुठे ?' हा प्रश्न विचारण्याचा मोह अनावर होतो. ' डोळे मिटणें ' ही सावी गोष्ट असली, तरी ' डोळे मिटणें ' या वाक्प्रचारानें दिग्दर्शित केलेली गोष्ट मात्र आपल्या हातांत नसते. यमराजाचे दूतच ती करावयास समर्थ असतात. वरील गोष्टी निसर्गनिर्मित असल्या तरी ' डोळा मारणें ' ही कला आहे. 'डोळा मारणें ' या शब्दांनीं शृंगाररसाच्या लहरी उत्पन्न होतात. पण या गोष्टीकडे 'काणा डोळा' करून आपण जाऊं या.

' डोळा ' या गोष्टीवर सर्वसाधारण विचार करून भागणार नाहीं. ज्यास तसें वाटत असेल त्यांनीं ' दिल्ली तो बहुत दूर है ' ही गोष्ट लक्षांत ठेवावी. मात्र ही दिल्ली नजीक आणण्याचा एक उपाय आहे. त्याकरितां पेशव्यांच्या हिंदुस्तानावरील स्वारीची गरज नाहीं. तो उपाय म्हणजे ' स्त्रियांचे डोळे ' या गोष्टीवर विचार करणें. ' स्त्रियांचे डोळे ! ' दोनच शब्द ! पण कृति किती भयंकर ! किती विस्मयजनक ! किती अवर्णनीय !! ह्या दोन शब्दांच्या आघातानें देव दानव बनतात, महारथी कोंकरें होतात, कवि फत्तर होतात, ऋषि राक्षस ठरतात आणि ब्रह्मचारी सहस्रनारींचे ' नाथ ' बनतात. ह्या डोळ्यांच्याहि निरनिराळ्या जाति आहेत. सुनेत्रा, सुलोचना, मृगनयना, कमलनयना, मृगाक्षी, हरिणाक्षी, कमलाक्षी, मीनाक्षी, मदिराक्षी, वगैरे. अखिल हिंदुस्थानांत जितके तट आहेत त्यांहींपेक्षां यांची संख्या जास्त होईल. वरील शद्वांपैकीं कोणताहि शद्ब उच्चारला, तरी डोळे चमकूं लागतात, कान हलूं लागतात, नाकपुड्या वरखालीं होण्याचा प्रयत्न करतात व जीभ ओंठावर फिरूं लागते. जीवाचें भान हरपून हृदयांत आनंदाच्या असंख्य ऊर्मि उठूं लागतात. ह्या सर्व जातींच्या डोळ्यांच्या

कृपाकटाक्षासाठीं मनुष्य सुतानें स्वर्गास जाऊं लागतो, मृगजलामागें धांवूं लागतो व गुढग्याला बाशिंग बांधण्यास तयार होतो. ह्याच्या-साठीं आस्तिक नास्तिक बनतात, भिडस्त निर्भीड होतात, शास्त्रज्ञ कवि बनतात आणि वैराग्याचा टेंभा मिरविणारे विश्वामित्र संसारी बनतात. ह्या कटाक्षासाठींच शंकरानें स्मशान सोडून कैलासाचा मार्ग धरिला आणि श्रीकृष्ण गोपींचा त्याग करून राधेबरोबर स्मशा-नांत गेला. वज्रधारी इंद्र, चौदा चौकड्यांचें राज्य भोगणारा रावण, जगाला अंकित समजणारा सेलीम, शेराचा बच्चा संभाजी, मराठ्या मारणारा राघोबादादा, यांच्या प्रत्येकाच्या आयुष्यांतील एक काळ असा गेला कीं, या कटाक्षाच्या नादीं लागल्यामुळें त्यांची कर्तबगारी मातीमोल ठरली. ह्याचें वर्णन करतांना कवि हात टेकतात, कादं-बरीकार घायाळ होतात व नाटककार ‘ नेति नेति ’ म्हणून स्वस्थ बसतात. असें हें जबरदस्त प्रकरण आहे बरें ! याला दुरूनच नम-स्कार असो.

## १० नारी जात

### स्त्री जात तेवढी निमकहराम !

( कै. गडकरी. )

कै. गडकऱ्यांनीं चारच शद्बांत सांगितलेला हा अनुभव अणुमात्र खोटा नाहीं. स्त्री जात नुसती कृतघ्न असती तर त्यांत दुःख करण्याचें कांहींएक कारण नव्हतें. परंतु कृतघ्नपणाच्या जोडीला जन्म जात मत्सरीपणाचा वांटाही तिनें उचलला आहे. लैंगिक भेदामुळें मानव वर्गाला स्त्रियांची गरज पडते ह्मणून. नाहीं तर पुरुषांनीं स्त्रियांना पायपोसाचें सुद्धां महत्व दिलें नसतें. पृथ्वीतलावर फार आश्चर्यकारक गोष्टी होऊन गेल्या, होत आहेत आणि होतीलहि; परंतु स्त्रियांच्या हाडींमासीं खिळलेल्या मत्सराएवढी आश्चर्यकारक गोष्ट अजूनहि पहाण्यांत आली नाहीं. अलंकारांनीं नटलेल्या आणि पराच्या गाद्यागिरद्यावर लोळून सबंध आयुष्य कंठणाऱ्या राणीला सुद्धां भिकारणीनें मूठभर तांदूळ जास्त मिळविले तर तें पाहून मत्सराग्नीची ठिणगी जाळूं लागते. काय हा मत्सर ! मत्सराचीं हीं जिवंत प्रेतें उत्पन्न करून ईश्वरानें केवढा अनर्थ प्रसृत केला आहे, हें पाहिलें ह्मणजे ईश्वर आंधळा तरी आहे किंवा दारू पिऊन तर्र तरी झाला आहे असें वाटूं लागतें. पिंवळी जर्द नागीण किती मनोहर दिसते. परंतु तिच्या दाढेंत हलाहलासारखें जलाल विष सांठलेलें असतें. तिला आश्रय द्यावयाचा ह्मणजे तिचे दांत पाडावेच लागतात; तरी सुद्धां व्यर्थ. फूत्कार टाकण्याची कृति ती करीत असतेच. ‘ कडूं कारलं तुपांत तळलं, साखरेंत घोळलं, तरी कडूं तें कडूंच !’ स्त्रीला पाळावयाची ही साधीसुधी गोष्ट नाहीं. डाव्या हातांत लगाम व उजव्या हातांत चाबुक, या दोन गोष्टी जवळ

नसल्या तर ही अस्वलीण माणसाचा बळी घेण्यासहि कमी करणार नाहीं. स्त्रियांच्या स्वभावांत आणखी एक मजा आहे. पुरुषवर्गापेक्षां स्वजातीयाशींच त्यांचें विशेष वैर दिसून येतें. इतकें कीं, त्यावरून ' याचको याचकान् दृष्ट्वा ' ह्या वचनाची आठवण येते. बरेच यत्न केले तर एका म्यानांत दोन तरवारी राहूं शकतील परंतु एके ठिकाणीं दोन स्त्रिया ? अग बाई ग भलतीच जगावेगळी गोष्ट ! ! ' न स्त्री स्वातंत्र्यमर्हति ' ह्मणून मनूनें कायदा केला तो खोटा कसा असेल ? हा कायदा प्रस्थापित करण्यांत त्याची अतिशय दूर दृष्टि दिसून येते. पृथ्वीतलावर अवतरल्यापासून नारी जातीनें शांततेऐवजी अनर्थ मात्र उत्पन्न केला आहे. अगदीं ऐन आनंदाच्या क्षणीं सुद्धां कांहीं तरी आठवणी काढून दुःखाश्रू गाळण्यास या कमी करीत नाहींत. देवा तुलाच रे बाबा डोळे ! या मायाविनींच्या हातून पुरुषवर्गास तूं कधीं सोडविशील हें तुझें तुलाच माहीत !

# ११ स्त्रियांचे गाल.

—:०:—

गुलाबपुष्पाचा मोहकपणा, पारिजात पुष्पाची नाजुकता, बटमोगऱ्याचा टवटवीतपणा, कमलपरागांची कोमलता आणि शिरीषपुष्पाचा मृदुपणा, यांचें ब्रह्मदेवानें एके ठिकाणीं मिश्रण तयार केलें. नंतर त्याचें काय करावें, हा प्रश्न त्याचे मनांत उभा राहिला. कांहीं दिवसांनीं विश्वकर्मा ' स्त्री ' नांवाचा एक मानववर्गीय प्राणी तयार करीत आहे असें त्याच्या लक्षांत आलें. तेथें गेला. विश्वकर्मा आपल्या प्रयोगशाळेंत ' स्त्री ' चें संशोधन करीत होता. ' स्त्री ' बहुतेक तयार झाली होती. ब्रह्मदेव तिला पाहून खुश झाला, तरी तिच्यांत कांहींतरी उणीव आहे असें त्याला भासत होतें. सूक्ष्म निरीक्षणानें तिच्या चेहऱ्यांत व्यंग आहे असें आढळून येतांच ब्रह्मदेवानें वर उल्लेखिलेलें मिश्रण तिच्या गालांत ओतून दिलें. नंतर मात्र ' स्त्री ' पूर्णावस्थेंत किंवा विद्यमान दशेंत बाहेर पडली.

अरुणोदय, वनश्री, पुष्पोद्यानें, निर्झर, सृष्टिमातेच्या पाठीवर ज्या अत्यानंददायी गोष्टी आहेत, त्यांत स्त्रियांच्या गालांना अग्रस्थान द्यावें लागेल.

ईषत्प्रफुल्ल सुमनाकडे बघून त्याला तोडण्याचा मोह ज्याप्रमाणें अनावर होतो, तीच स्थिति स्त्रियांचे गाल पाहून होते; कारण स्त्रीकपोल हीं पुष्पेंच होत. उमलणें व कोमेजणें या क्रिया तर स्त्रीकपोलावर उठावदारपणें दिसून येतात.

गुलाबी रंग व स्त्रियांचे गाल यांचें नातें निकटचें व गुंतागुंतीचें आहे. रागानें येणारा गुलाबी रंग, अनुरागानें येणारा गुलाबी रंग, उन्हानें येणारा गुलाबी रंग, भूतकाळांतील मधुर स्मृतींनीं किंवा भावी काळांतील गोड मनोराज्यांनीं येणारा गुलाबी रंग, इत्यादि

एकाच गुलाबी रंगाचे अनेक प्रकार एखाद्या निरीक्षणपारंगत कवीस स्त्रियांच्या गालावर स्पष्टपणें दिसून येतात. गालांवर अमक्या प्रकारें गुलाबी रंग उठलेली स्त्री अमक्या मनःस्थितींत आहे, हें तो निर्धास्तपणें सांगू शकेल. स्त्रियांत गुलाबी गाल असलेल्या स्त्रीस विशेष महत्व आहे तें या करितांच.

स्त्रीच्या गुलाबी टवटवीत गालांवर तिच्या हास्यानें खळी पडली, तर दुधांत साखरच काय परंतु बदामपिस्ते टाकल्याप्रमाणें होतें. सौंदर्याच्या प्रदर्शनांत असल्या गालांना पहिलें बक्षीस आहे.

पुष्कळ तरुणी पाश्चात्य पद्धतीस अनुसरून गालांस पावडर लावतात. यामुळें गालांवरील निसर्गनिर्मित सौंदर्याचा उठावदारपणा निघून जातो व त्यांचें गाल विरविरीत मेघाखालीं झांकलेल्या चंद्र-ग्याप्रमाणें दिसतात. परंतु सौंदर्यसाधनाच्या दृष्टीनें पावडर लावणें हितावह असल्यास त्यांनीं तसें खुशाल करावें. एखाद्या ' श्यामा ' युवतीनें मात्र गालांस पावडर लाविली तर पिठोरी अमावस्येचा अवतार झाल्याचा भास होतो.

' पुरुषांच्या गालांत, कांहीं 'लिहिण्यासारखें' आहे असें मला वाटत नाहीं. उपमाच द्यावयाची झाली तर शेवाळ उगवलेल्या नर्मदेंतील लंबवर्तुल गोट्याची पुरुषकपोलांना उपमा देतां येईल.

प्रेमळ वाचक, ' स्त्रियांचे गाल ' ही अशी तशी गोष्ट नाहीं कीं ती या कानानें ऐकून त्या कानानें सोडून देतां येईल. ' स्त्रियांचे गाल ' ही एक दिव्य शक्ति आहे व आपल्या अचाट सामर्थ्यानें ती जगास हलवून सोडीत आहे.

# १२ रडणें

साखर आणि तिची गोडी यांत भिन्नता आहे का ? सृष्टीची उत्पत्ति आणि रडें यांचेंहि साखर व तिची गोडी याप्रमाणेंच अभिन्नत्व आहे. मर्दासारखा सागर, त्याची सहधर्मचारिणी सरिता, ती काळतोंडी निशा, निर्जन रानांतील वनदेवींचे तांडे--लोकहो, पहा जगाच्या उत्पत्ति पासून ही सर्व रडत बसलीं आहेत.

मूल जन्मास आल्याबरोबर रडूं लागतें. लहानपणीं आईबापांना व मोठेंपणी सुहृद्वर्गाला रडवून म्हातारपणीं माणुस स्वतःच रडतो. इतकचें काय, मेल्यानंतर सुद्धां बाजूच्या लोकांस हक्कानें रडावयास लावतो.

रडणें आहे ह्मणून जगांत आनंद आहे. नेहमीच श्रीखंडपुरीचें जेवण रुचकर लागेल कां ? नाहीं. मधून मधून झुणका भाकरीच पाहिजे.

रडणें आणि धबधबा याचें फार साधर्म्य आहे. पाण्याची धार व आवाज या दोन गोष्टी धबधब्यांत दिसतात. अश्रूंची धार व घशाचा टाहो यांचें ऐक्य रडण्यांत प्रतिबिंबित होतें.

नारी जात रडवी नसती तर पुरुषांना आपला मर्दपणा दाखविण्यास अवसर मिळाला नसता. एकादी असहाय्य अबला आहे, दुष्ट मनुष्य तिला त्रास देत आहे, ती अश्रू ढाळीत आपल्याशीं मदतीची याचना करण्यास आली आहे, तिच्याविषयीं कींव व त्या दुष्ट मनुष्याचा आपणांस राग आला आहे, तिला आपण अभयवचन दिलें आहे, त्या दुष्ट मनुष्याला चांगली शिक्षा करण्याची आपण प्रतिज्ञा केली आहे, अहाहा ! किती मनोहर आहे हें दृश्य ! या

मनोहर दृश्याचा उगम त्या स्त्रीच्या रुदनांत आहे हें लक्षांत ठेविलें पाहिजे.

नाहींतरी शृंगाररसापेक्षां करुणरसच बहुजनसमाजास जास्त आवडतो. ' स्वयंवरा ' पेक्षां ' एकच प्याल्या'ला जास्त गर्दी दिसते ती उगीच नव्हे !

रडणें ही एक अतिशय अद्भुत गोष्ट आहे ! दुःखानें मनुष्य रडतो, असें म्हणतात; परंतु आनंदातिरेकानेंसुद्धां माणसें रडतात. पुत्रवियोगामुळें रडणारी आई पुत्रभेटीमुळेंही अश्रूच ढाळते.

जीवसृष्टिनंतर देवघेवीकरितां ब्रह्मदेवानें शद्बसृष्टि निर्माण केली. त्यानें शद्बसृष्टीचे स्वर व्यंजनें असें दोन भाग पाडिले. पहिल्यानें त्यानें स्वरांना जन्म दिला. स्वर म्हणजे काय ? रडण्याची शिस्तवार पद्धत ! नुसतें व्यंजनांच्या उच्चारानें रडतां येणें शक्य नाहीं. परंतु रडण्याच्या कार्याची पूर्तता नुसत्या स्वरांनीं होऊं शकते. शद्बसृष्टि-सुद्धां पन्नास टक्कयांनीं रडवी असावी, अशी ब्रह्मदेवाची इच्छा दिसते.

एरव्हीं त्रासलेले श्रोते ' भैरवी ' सुरूं होतांच माना डोलवतांना आपण पहातों. ' भैरवी ' ही ' रडण्याची रागिणी आहे. परंतु कोणत्याही स्थळकाळपरिस्थितींत ती गोड लागतेच कीं नाहीं ? नाटक, बैठक, कीर्तन, समारंभ, यांचा शेवट भैरवीनेंच होतो.

विश्वाची उत्पत्ति रडण्यांत झाली, विद्यमान स्थितींतहि तें रडत आहे व त्याचा लयहि रडण्यात होणार आहे.

# १३ धर्मभगिनी.

निष्काम प्रेम, कुतूहल आणि समभावना या त्रयींकरिता रक्ताचें नातें नाहीं अशा मनुष्यांशींसुद्धा सर्वस्व अर्पण करून बंधुभावानें वागणारा स्त्रियांचा एक वर्ग समाजांत आढळून येतो. या वर्गांतील स्त्रीलाच ' धर्म भगिनी ' म्हणतात.

' धर्मभगिनी ' हा शब्द येथें संकुचित अर्थानें वापरला आहे. नाहींतर, आई, बायको आणि नात्यांतील बहिणी या सोडून दिल्या तर जगाच्या पाठीवरील सर्व स्त्रिया मनुष्याच्या ' धर्मभगिनी ' होऊं शकतात.

आईबापांची इच्छा असली तर सख्या बहिणींचें लेंढार मिळण्यास मुळींच अडचण पडत नाहीं, परंतु भगीरथ प्रयत्न करावे तेव्हां कोठें एकादी ' धर्मभगिनी ' मिळते.

दयाळू ईश्वरानें मानवप्राण्याला आराम मिळण्यासाठीं जीं अनेक साधनें दिलीं आहेत, त्यांतील ' धर्मभगिनी ' हें एक प्रमुख आहे.

प्रत्येक तरुणाच्या आयुष्यांत असा एक काळ येतो कीं त्याच्यावर एकाद्या धर्म भगिनीचें नियंत्रण नसेल तर त्याचें आयुष्य अधोगतीस जातें. बेकारी, परीक्षेंतील अपयश, नवीन धंद्यांत आलेली ठोकर, वृद्ध आईबापांशीं किंवा घरांत परस्पर तेढ आणणाऱ्या गोष्टी, वगैरे गोष्टी तरुणाच्या आयुष्यांत प्रत्यहीं घडतात; अशा वेळीं धर्मभगिनी पुढें सरसावून मायेचा आसरा, भावनेचा ओलावा, धैर्याचे शब्द, प्रेमाची पाखर आणि समजुतीचें सरबत वगैरे गोष्टींची पंचारती घेऊन आपल्या धर्मबंधूस ओंवाळते. या ओंवाळणीनें त्याला इतका अनिर्वाच्य आनंद होतो कीं झालेली दुःखें, अपमान जखमा तो विसरून जातो.

रक्ताची बहीण सुद्धां भावाच्या श्रीमंतीकडे काकनजरेनें पहाते असें म्हणतात; परंतु धर्मभगिनी मात्र भावाकडून फक्त प्रेम आणि भावना या दोन गोष्टींचीच जन्मभर अपेक्षा करीत असते. तिचें प्रेम प्रेमाकरितां असतें. ' भाऊबीजेच्या ओंवाळणी ' करितां नव्हें !

सुभद्रा ही श्रीकृष्णाची रक्ताची भगिनी ना, परंतु द्रौपदीच्या प्रेमाची सर तिला येणार नाहीं. आपल्या पेक्षां द्रौपदीवर श्रीकृष्ण जास्त प्रेम करितो, याबद्दल सुभद्रेला नेहमीं वैषम्य वाटे व ती तसें बोलून दाखवीत असे. एकदां असें झालें कीं श्रीकृष्णाच्या हाताचें बोट कापलें. दोघींच्याही जवळहि बोटाला बांधण्याकरितां त्यानें चिंधी मागितली. सुभद्रा चिंधीकरितां सबंध राजवाडा शोधूं लागली परंतु द्रौपदीनें आपल्या जरतारी शालूचा पदर फाडून त्याची चिंधी पुढें केली. घटकाभरानें सुभद्रेनें प्रयासानें एक चिंधी आणिली, परंतु श्रीकृष्णाचें कार्य होऊन गेलें होतें. द्रौपदीनें आपला पदर फाडून त्याला चिंधी दिली, हें पाहून सुभद्रा खजील झाली. श्रीकृष्ण आपल्यापेक्षां द्रौपदीवर जास्त प्रेम कां करितो, हें तिला तेव्हां कळून आलें. याला म्हणतात दिव्य प्रेम !

प्रेमाचें प्रत्यंतर अगदीं क्षुल्लक गोष्टीपासून दिसून येतें. तुमची ' धर्मभगिनी ' देवळांत मिळणारी कीर्तनानंतरची चिमुटभर खिरापतसुद्धां तुम्हांला दिल्याशिवाय खाणार नाहीं, परंतु पंचपक्वान्नें जेवणाऱ्या तुमच्या सख्या बहिणीस तुमची आठवणसुद्धां होत नसेल !

ब्रह्म म्हणजे काय ही अनुभवानें जाणण्याची गोष्ट आहे. वेदांत नुसता वाचून ती कळणार नाहीं. तद्वतच धर्मभगिनी. ' धर्म भगिनी'वर हजारो ग्रंथ वाचले तरी तिचें यथार्थ ज्ञान होणार नाहीं. त्याकरतां ' धर्म भगिनी'च संपादन केली पाहिजे.

# १४ न्हावी !

शिरोवतरण वाचून शिष्ट वाचक नाकें मुरडतील, परंतु ' न्हावी' या शब्दांत तिरस्कारदर्शक अशीं काय गोष्ट आहे, याचें समर्थन ते करूं शकणार नाहींत. ज्याचा सारा जन्म समाज सेवेसाठीं वाहिलेला आहे, अशा या वर्गाची मानव जातीकडून निरर्थक अवहेलना होत असते.

न्हावी नसला तर ?— न्हावी नसेल तर मनुष्याचा प्रपंच चालणार नाहीं. लग्नाची सखी बायको—पण ती सुद्धां वाढलेली दाढी आणि केसांचा ब्रह्मचारी वटुप्रमाणें रुबाब पाहून नवऱ्याला घराबाहेर हाकून देईल, किंवा स्वतः तरी नवऱ्यापासून दूर राहील. न्हाव्यांनीं जर एकाद्यावर बहिष्कार घातला तर त्याच्या संसाराचे अशा रीतीनें बारा वाजण्यास अडचण पडणार नाहीं.

न्हाव्याचा धंदा धर्म संस्कृतीनें सुद्धां मान्य केला आहे. उपनयनविधि आणि प्रेतसंस्कारविधि हे त्याची साक्ष देतील.

गावांतील गटारबातम्या, ग्रामसिंहांचीं आत्मचरित्रें, बड्या माणसांचीं गुप्त कृत्यें, गृहच्छिद्रें—सारांश, राजाच्या वाड्यापासून तों भिकाऱ्योच्या झोपडीपर्यंतच्या सर्व बातम्या मिळविण्याचें 'न्हावी' हें एकच साधन आहे.

पक्षीं वर्गांत कावळ्याला धूर्त व लबाड ह्मणुन एक प्रकारचें वैशिष्ट्य प्राप्त झालें आहे. त्याला तोडीस तोड म्हणून मानव जातींतून न्हाव्यास पुढें करतां येईल. ' नरेशु नापितो धूर्तः' असें वचन आहे. गिऱ्हाइकाला 'पाणी लावून ठेवून' 'दाढीवर हात फिरवीत ' बसविण्याचें कसब त्याच्या हातांत असतें. न्हाव्याजवळ त्याचे धंद्याचे बाबतीत भांडण करा, तो ' टाळूवरील केसहि शिल्लक ठेवणार नाहीं.

पूर्वीचे राजेलोक न्हाव्यांना हेर खात्यांत नेमीत असत, ही गोष्ट सांगण्याकरितां इतिहास संशोधकांचा तांडा आणण्याची गरज नाहीं. राज्यकारभारांतील एक प्रमुख खातें त्यांच्या ताब्यांत होतें. प्रपंच करून परमार्थ साधण्याचें, किंवा धंदा संभाळून देशसेवा करण्याचें कार्य न्हाव्यांनींच करावें.

न्हाव्याच्या अंगीं एक मोठें कसब आहे. तो आपली चूक प्राण गेला तरी कबूल करणार नाहीं. दाढी करतांना कोठें कांपलें गेलें, तर—' छे ? कापलें नाहीं ! पुटकुळी होती, ती फुटली; रक्ताचा एक थेंब आलासें वाटतें; दाढीचे केंस रांठ झाले आहेत; तुह्मीं जरासें हलविलेंत —इत्यादि डझनभर वाक्यें तो तोंडावर फेकील परंतु ' कापले आहे ' ही गोष्ट तो बिलकुल कबूल करणार नाहीं.

मनुष्याच्या हरघडी उपयोगीं पडणाऱ्या या प्राण्यास अशा रीतीनें छेडलें जावें, – ' न्हावी, ' ' हाजाम ' हें शब्द शिव्या ह्मणुन ठरले जावे, हें मानवाच्या क्षुद्र मनोवृत्तीचें प्रदर्शन नव्हें तर काय ?

REFBK-0005251
क्र. ५२५१

# १५ कवीची बायको.

समाजपद्धतीप्रमाणें लग्नानंतर ‘ बायको ’ मिळते; परंतु लग्नापूर्वींहि कवीला ‘ बायका ’ असतात. त्यांतील एक पट्टराणी असून बाकीच्या प्रभावळींतील असतात. पट्टराणीला तो स्वतःच जन्म देतो. कोणत्याशा एका पुराणांत ब्रह्मदेव स्वकन्येशींच ‘ वल्लभ ’ या नात्यानें वागतो, असें सांगितलें आहे. हें जर खरें असेल तर कवि आणि ब्रह्मदेव एकाच माळेचे मणि होत. कवीची पट्टराणी म्हणजे त्यानें स्वतः प्रसविलेली कविता होय. तिच्यावर तो प्राणापलीकडे प्रेम करतो. ‘ प्रभावळींतील राण्या ’ म्हणजे ज्यांच्यामुळें त्याला काव्यस्फूर्ति होते व ज्या त्याच्या काव्यावर किंवा काव्यगायनावर बेहोष खुष असतात, त्या अल्लड, खेळकर, कुमारिका; यांच्यावर विचार करण्यांत अर्थ नाहीं, कारण लग्नापूर्वी कित्येक ‘ तरूण तरुणी ’ एकमेकांस भावी ‘ नवरा बायको ’ समजत असतात. शेवटीं अनुभव मात्र निराळाच येतो. यास्तव यावर सविस्तर लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

व्यवहारांत एकच लग्न झालें तरी कवीला दोन बायका असतात. एक ‘त्याची कविता’ व दुसरी ‘लग्नाची बायको, ’ पैकीं पहिलीचा दुसरी सदानकदा द्वेष करते. या स्वप्रसव स्त्रीवर कवी कायावाचामनें प्रेम करतो, हें पाहून बिचारी ‘दुसरी’ जळणार नाहीं तर करणार तरी काय ? हो—म्हण आहेना—बायकांना पिठाची सवतसुद्धां खपत नाहीं; आणि कवि तर या ‘ पहिली ’मुळें पागल झालेला !

कवीच्या ‘ लग्नाच्या बायको ’ विषयीं सांगावयाचें म्हणजे तो एक ‘ बिचारा जीव ’ असतो. तिला कधीं नटण्यामुरडण्याची वेळच येत नाहीं, कारण तिचा पति तिच्याकडे पहातच नाहीं, तिनें दागिन्यांची मागणी करतांच नवरा तिच्यावर ‘ उपमा, उत्प्रेक्षा, अनुप्रास ’ इत्यादि अलंकारांचा इतका वर्षाव करतो, कीं त्या भारानें

ती वांकूनच जाते. तिला गाण्याची उपजत आवड असली तरी लग्नानंतर ती लागलीच विरून जाते. इतकेंच काय, परंतु.... ' काव्यगायन ' हा शब्द ऐकून सुद्धां ती गरीब हरिणीप्रमाणें भेदरून जाते. कल्पनामय विरहानें तिचा पति उसासे टाकतो तर ' नालायक नवऱ्याच्या ' नांवानें ती उच्छ्वास टाकीत असतें. काव्यगायनाच्या कार्यक्रमाकरितां कवि जागरण करतो तर पति-सहवासाचा अभाव म्हणून ती बिछान्यावर तळमळते. काव्याच्या कैफामुळें कवि देहभान विसरतो तर विरहाग्नीच्या हाळीमुळें ती देहभान विसरते. कवि चक्रम ' असतो; ' त्याच्यामुळें ती मात्र चक्रम 'बनते. ' सारांश काय, दोघेहीं करतात एकच गोष्ट परंतु त्याचीं कारणें मात्र निराळीं. दोन समांतर रेषांप्रमाणें त्यांचे सख्य नसून तें कोनाच्या रेषांप्रमाणें असतें. ज्या बिंदूशीं या रेषा भेटतात, तेथें मात्र त्यांचें घर्षण चालू होतें आणि मग क्रोधाचें ऊन, डोळ्यांतील विद्युत्, जिभेचा कडकडाट, अश्रूंचा पाऊस, वगैरे दृश्यें पहाण्यास मिळून या ऊन-पावसावर काव्य लिहिण्याचा एक नवीन विषय कविस मिळतो.

' कवीची बायको ' हा एक लोकांच्या हास्याचा विषय आहे. रसिकांस शृंगाराचे धडे देणाऱ्या कवीची स्वपत्नीजवळ, ' लोकां-सांगे ब्रह्मज्ञान, आपण स्वतः कोरडा पाषाण, ' अशी वृत्ति असते.

माझ्या भोळ्याभावड्या भगिनींनो, आजन्म अविवाहित रहा-ण्याची वेळ आली तरी चालेल परंतु ' कवीची बायको ' होण्याची इच्छा धरूं नका. कवि म्हणजे ' कमल ' असेल.... परंतु तें ' सरोज नव्हे ' ' पंकज ' आहे, हें ध्यानांत धरा. तोडण्यास गेलां तर हातांस चिखलच चिकटेल. जरा निरखून पहा, म्हणजे पुष्कळ कवींच्या बायकांचें जीवन निराशेचें रूक्ष व भकास असलेलें दिसून येईल. ' कवीची बायको ' म्हणजे नाटकी जीवनरूपी जाळ्यांत निर्दयपणें पकडलेली.... नाजूक पक्षिणी आहे.

